आंदोलन

वर्ष 16 | अंक 06 | मूल्य 25/-
शाश्वत विकासासाठी
जानेवारी 2025 | पृष्ठे 36



लोकशाही समाजवादी चळवळीच्या नव उभारणीचा निर्धार!

आंदोलन
शाश्वत विकासासाठी
जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे मासिक संवाद माध्यम

शाश्वत विकास न्यासाचा उपक्रम

वर्ष सोळावे, अंक सहावा

जानेवारी २०२५ ॐ मूल्य रु. २०/-

- **संपादक**
  मेधा पाटकर

  संपादक मंडळ
  प्रा. सुभाष वारे, मीनल उत्तुरकर, अमेय तिरोडकर, सुनीती सु. र., सुरेश सावंत, साधना दधीच, मिलिंद चंपानेरकर, राज असरोंडकर
- **कार्यकारी संपादक**
  संजय मंगला गोपाळ
  ९८६९९८४८०३
- **व्यवस्थापक**
  शरद जोशी
  ७०४५००३६४०
- **पत्रव्यवहार व वर्गणी पाठविण्याचा पत्ता**
  आंदोलन शाश्वत विकासासाठी
  द्वारा शरद जोशी
  बी/ ९, मेघमल्हार, गावंड पथ,
  मल्हार सिनेमा जवळ, नौपाडा,
  ठाणे (प.) ४००६०२
- **अक्षर मांडणी**
  पंकज गुरव
- **मुखपृष्ठ मांडणी**
  प्रतीक ठाकूर
- **मुखपृष्ठावरील छायाचित्रे**
  'आंदोलन'च्या संग्रहातून व इंटरनेटवरून
- **मुद्रणस्थळ**
  श्री गुरुकृपा प्रिंटर्स, माहिम, मुंबई - १६
- **शाश्वत विकास न्यासाचे कार्यालय :**
  द्वारा - ६, राघव, श्री रघुराज सोसायटी, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०
- दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होते.
- अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

कृपया वर्गणीचे दर वाढविण्यात आलेले आहेत

कार्यकर्ते/विद्यार्थ्यांना वर्गणीत सवलत मिळू शकेल.
खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर सवलतीसाठी संपर्क साधा.
आंदोलन शाश्वत विकासासाठीची वर्गणी भरा आता ऑनलाईन !

Name of A/c.: Andolan Shashwat Vikasasathi
Bank Of India, Naigaum Cross Road Branch, Dadar (East), MUMBAI 400014. Current A/c No.: 003520110001099, IFSC: BKID0000035

वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर खाली दिलेल्या ईमेल किंवा मोबाईलवर मेसेज करून लागलीच कळवा ! ईमेल : andolan.magazine@gmail.com
मोबाईल : 9869984803/ 9869392013/ 7045003640

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय - मराठी संवाद माध्यमाचा अंक - वर्ष २९ अंक १

कार्यालय : आंदोलन शाश्वत विकासासाठी, द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, ए विंग, हाजी हबीब बिल्डिंग, नायगांव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.

वार्षिक वर्गणी - व्यक्ती - रु. ३००/- संस्था - रु. ४००/-
१२ वर्षांची वर्गणी - व्यक्ती रु. ३,०००/- संस्था - रु. ४,०००/-

• आपण एकाहून अधिक वर्षांसाठी वर्गणी भरू शकता. • चेक/ड्राफ्ट 'आंदोलन शाश्वत विकासासाठी' ह्या नावाने काढावा. • वर्गणी शक्यतो चेक/ड्राफ्टनेच पाठवावी • तसे शक्यच नसल्यास मनिऑर्डरने पाठवावी.

• चेक/ड्राफ्ट/मनीऑर्डर ठाण्याच्या पत्त्यावरच पाठवाव्या.

संपादकीय

लोकशाही समाजवाद चळवळ सामूहिक प्रयत्नातून पुढे नेण्याचा निर्धार!

गेले दीड – दोन वर्षे साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाच्या पुढाकाराने आणि स्मारकाच्या छावणीत सहभागी झालेल्या युवकांच्या सहभागातून एक स्वप्न पाहिले होते. त्याचा पहिला टप्पा साकारताना पाहायला मिळाला २१ – २२ डिसेंबरला पुण्यातल्या साने गुरुजी स्मारकात अर्थात राष्ट्र सेवा दलाच्या मध्यवर्ती कार्यालयाच्या प्रांगणात. निमित्त होते साने गुरुजी १२५ अभियानाच्या सांगता समारंभाचे. या दोन दिवसाच्या कार्यक्रमाचा पुरेसा सविस्तर रिपोर्ताज या अंकात आहे. त्यातून सांगता समारंभातील प्रत्येक सत्रातून मिळालेली नवी दिशा स्पष्ट होते. शिवाय योगेंद्र यादव, विलास किरोते, हेरंब कुलकर्णी यांचेही पूरक लेख अंकात आहेत. त्या सगळ्यातून स्वप्नाचा पुढला टप्पा - लोकशाही समाजवादाची सामूहिक आणि एकत्रीत चळवळ – सुरु करावा लागेल.

लोकशाही समाजवाद ही प्रवाही विचारधारा आहे. कुणा एका विचारवंताला किंवा नेत्याला निष्ठा वाहून, बाबा वाक्यम प्रमाणम अशी पद्धत समाजवादी प्रवाहात अभिप्रेत नाही. त्यामुळे समाजात कालपरत्वे जे नव नवे प्रवाह, तंत्रज्ञान, समस्या, राजकारण उभे रहाते त्यावर लोकशाही, समता, स्वातंत्र्य, सर्वसमावेशकता आदी मूल्यांच्या अधीन राहून भूमिका विकसित करणे आणि त्यानुसार कृती कार्यक्रम आखून अंमलबजावणी करत रहाणे हे समाजवादात बसते. त्या अनुषंगाने, लोकशाही समाजवादी चळवळीने भारतीय समाजातील विविध कळीच्या आणि ज्वलंत मुद्द्यांवर प्रभावी संघटन उभे करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानातील मूल्यांना नख लावण्याचे राजकारण होत असतांना संविधान संवर्धन चळवळ जोमाने पुढे न्यावी लागेल.

नव्या तंत्रज्ञानाचा अगदी गावाकडल्या नव्या (आणि जुन्याही) पिढीने केलेला वा (करावा लागलेला) स्वीकार याचे भान आपल्याला आता बाळगावे लागेल. विज्ञान किंवा तंत्रज्ञानाला पर से आपला विरोध नसून त्याच्या सामाजिक – आर्थिक परिणाम – दुष्परिणामांचा हा प्रश्न आहे. त्यादृष्टीने प्रत्येक बाब पूर्वग्रह टाळून मूल्यांकित करून त्याबाबत भूमिका घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मैला सफाईच्या कामात कितीही खर्च आणि आधुनिक तंत्रज्ञान आणावे लागले तरी ते आणून, दलित जाती समूहातील अगदी तळाच्या जाती समूहातील कामगारांना हे काम करावे लागणार नाही असे यांत्रिकिकरण आणायलाच हवे. शेतीवर परिणाम करणाऱ्या हवामान आणि पर्जन्याचे अंदाज वेळीच अचूकपणे बांधता यावेत, यासाठीचे संगणकीकरण स्वीकारलेच पाहिजे.

रचनात्मक कार्य, पुरेशी आणि प्रभावी संघटनात्मक पक्षबांधणी, कॅडर बांधणीसाठी कार्यकर्त्यांची पद्धतशीर वैचारीक तयारी या साऱ्या बाबत समाजवादी चळवळ कमी पडली. 'ध्येय आमुचे हे ठरले, कार्य दुसरे ना उरले! क्षणभर आता राहू न आम्ही शांत, कधी ना शांत, कधी ना शांत!' या सेवा दलात गायल्या जाणाऱ्या गीतातील भावार्थ लक्षात घेवून, लोकशाही समाजवादी चळवळीच्या यापुढील धुरीणांनी, चळवळीच्या इतिहासातून योग्य धडे घेत जर लोकशाही समाजवादी चळवळीची पुनर्बांधणी मनावर घेतली तर राष्ट्र सेवा दल ही मातृसंघटना म्हणून पूर्ण राजकीय भान राखत विकसित करता येईल. सहकार, शिक्षण, आरोग्य, शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, युवा, पर्यावरण आदी क्षेत्रातील समविचारी संस्था – संघटना सेवा दल वाढवण्यासाठी कृतीप्रवण करता येतील. यातून तयार होणारे लोकशाही समाजवादी विचारांचे केडर विविध क्षेत्रात कार्यप्रवण होताना, या संस्था संघटना सेवादलाशी बांधील रहातील. या सर्वांना बांधणारी, केवळ निवडणुकांच्या राजकारणाशी नव्हे तर व्यापक जन राजकारणाशी बंधिलकी मानणारी जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM) सारखी आघाडी सहभागी संघटना – संस्थांशी विचार विनिमय करत, समाजवादाचे राजकारण पुढे नेत राहील. अनुभवी आणि नव्या दमाच्या समाजवादी साथींनी यासाठीचा धीर, संयम, धोरणात्मकता, एकजूट, शिस्त आणि लोकतांत्रिक संघटना पद्धतीचा अवलंब करण्याची तयारी दाखवणे अत्यावश्यक आहे. तसे झाले तरच आम्ही सेवा दलात आवेशात गात असू ते, 'समाजवादी साथी गाती एका आवाजात, ध्येयाचे हे गीत घुमवू अवघ्या अवकाशात', हे गीत केवळ आशा व्यक्त करणारे म्हणून नव्हे तर वास्तवात उतरवू शकू!

संजय मं. गो., कार्यकारी संपादक

साने गुरुजी १२५ अभियान

सांगता समारंभ! लोकशाही समाजवादी नव-अभियानाची सुरुवात!

सिरत सातपुते

पुण्यात राष्ट्र सेवा दल मध्यवर्ती कार्यालय प्रांगणात साने गुरुजी स्मारक येथे झालेल्या, साने गुरुजी १२५ अभियान सांगता समारंभाचा संक्षिप्त रिपोर्ताज.

साने गुरुजी शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीच्या निमित्ताने देशभरातील सुमारे ८२ समविचारी संस्था, संघटना, आंदोलनांनी गेले वर्षभर साने गुरुजी १२५ अभियान राबविले. वर्षभर साने गुरुजींच्या विचारांचा जागर केला. साने गुरुजी १२५ अभियानाचा सांगता समारंभ २१, २२ डिसेंबर २०२४ रोजी साने गुरुजी स्मारक, पुणे येथे संपन्न झाला.

समारंभाच्या दोन दिवसात साने गुरुजी विचार फेरी/मिरवणूक, युवा मेळावा, सर्वधर्मीय महिला संवाद मेळावा, कलाविष्काराचे महत्व, लघुपट प्रदर्शन, पथनाट्य व सांस्कृतिक अभिव्यक्ती, साने गुरुजी विचार दर्शन परिसंवाद, प्रसिद्ध कलाकार अक्षय शिंपी प्रस्तुत सांस्कृतिक कार्यक्रम - दास्तॉगोई: 'ईदगाह' या प्रेमचंद यांच्या कथेचं सादरीकरण आणि समारोप अश्या स्वरूपाचे कार्यक्रम आयोजित केले गेले. पुणे शहर, उर्वरित महाराष्ट्र येथील सुमारे ८०० कार्यकर्त्यांनी या सांगता समारोहात हजेरी लावली. यात केरळ, मध्यप्रदेश आणि गुजरात येथील साथींचाही समावेश होता. या सगळ्याचा हा संक्षिप्त आढावा.

पथनाट्य सादरीकरण:

२१, २२ डिसेंबरच्या दोन दिवसीय कार्यक्रमापूर्वी राष्ट्र सेवा दल पुणे जिल्ह्यातील युवा कार्यकर्त्यांनी १४ व १५ डिसेंबर रोजी पुणे शहरातल्या वीस ठिकाणी पथनाट्य सादर करून साने गुरुजींच्या विचारांचे जागरण केले. 'जगाला प्रेम अर्पावे' आणि 'साने १२५' ही दोन पथनाट्य अमोल अरोटे, संघर्ष, शिबा दीपाली संजय, श्रावणी तांगडे, शुभम माळवे आणि साथी यांच्या दोन टीमने सादर केली. या पथनाट्य सादरीकरणास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. जागोजागी फलक लावले. 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम आर्पावे' या घोषणा रंगवल्या.

प्रभातफेरी व उद्घाटन समारंभ, कलाविष्कार:

'साने गुरुजी अमर रहे ' च्या कोवळ्या स्वरातल्या घोषणा, मुलांसोबत समतेच्या निर्धाराच्या घोषणा देत अग्रणी असणाऱ्या जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मेधा पाटकर, खरा तो एकची धर्म, लहूका रंग एक है, अशा गाण्यांच्या तालावर आणि रोल झांजेच्या गजरात निघालेली जनजागर करणारी प्रभातफेरी! हे दृश्य होते पुण्याच्या रस्त्यावर गुलाबी थंडीत निघालेल्या प्रभातफेरीचे, साने गुरुजी १२५ अभियानाची उर्जा दर्शविणारे! पुणे येथील राष्ट्र सेवा दलाच्या साने गुरुजी स्मारकाच्या प्रशस्त प्रांगणात २१,२२ डिसेंबर २०२४ रोजी साने गुरुजी १२५ अभियानाचा दोन दिवसीय सांगता समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभाची सुरुवात प्रभातफेरीने झाली. साने गुरुजी स्मारक ते सारस बाग, सणस मैदान, नीलायम चौक, दांडेकर पूल हा मार्ग गाणी घोषणांनी दुमदुमून गेला होता. या प्रभातफेरीत रावसाहेब पटवर्धन विद्यालय आणि कष्टकरी विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपति शिवराय, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, मौलाना आझाद, छत्रपति शाहू महाराज, साने गुरुजी या महान व्यक्तींच्या वेशभूषा केल्या होत्या.

प्रभातफेरीची सांगता आणि अभियानाच्या सांगता समारंभाचे उद्घाटन साने गुरुजी स्मारकाच्या मैदानात झाले. गेल्या वर्षभरात महाराष्ट्र आणि गोवा, केरळ, गुजरात, उत्तरप्रदेश, बिहार, कर्नाटक, मध्यप्रदेश या राज्यांतील शाळा, महाविद्यालयांतील किशोरवयीन व तरुण मुलांमध्ये, शिक्षकांमध्ये तसेच गावागावांत साने गुरुजींच्या विचारांचा जागर सुरू होता. उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील मातृमंदिर आणि नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अभिजित हेगशेट्ये उपस्थित होते. प्रभातफेरीतील विद्यार्थ्यांच्या विशेष उपस्थितीत राष्ट्र सेवा दल कार्यालयातील जेष्ठ कर्मचारी पांडुरंग चौरे व युवा मेळाव्यातील वस्तीतील विद्यार्थिनी फलक खान या विद्यार्थीनीच्या हस्ते कुंडीतील

झाडाला पानी घालून विचारांच्या जागराच्या या अभियानाच्या सांगता समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी अभिजित हेगशेट्ये म्हणाले, "आजच्या द्वेषमूलक वातावरणात जात, धर्माबद्दलचा विषारी विचार पसरवला जातोय. अशावेळी समतेचा विचार सांगण्यासाठी साने गुरुजींच्या श्यामची आईची गरज आहे". ही विचारांची चळवळ पचवणे आजच्या जगात सोपे नाही असे सांगून ह्या विचारांचा वारसा जगाला प्रेम अर्पावे म्हणत तुम्ही विद्यार्थ्यांनी पुढे चालवला पाहिजे अशी अपेक्षा हेगशेट्ये यांनी व्यक्त केली.

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे सचिव प्रसिध्द पॉटरी कलाकार राजेश कुलकर्णी यांच्या पुढाकाराने व जेष्ठ चित्रकार रमाकांत धनोकर यांच्या जादुई कलाकारीने आणि राष्ट्र सेवा दल पुणेच्या सेवादल सैनिकांच्या अहोरात्र मेहनतीने साने गुरुजी स्मारक या सोहोळ्यासाठी सजले होते. प्रांगणात प्रवेश करताच साने गुरुजी १२५ अभियानाच्या लोगोच्या पताकांनी स्वागत होत होते आणि पावलं रेंगाळत होती साने गुरुजींचा कटआऊट असलेल्या इन्स्टॉलेशनपाशी. पुण्यातील आंतरराष्ट्रीय किर्तीचे प्रसिध्द चित्रकार राजू सुतार यांनी क्युरेट केलेले हे कागदी इन्स्टॉलेशन सेनानी साने गुरुजींचा साहित्यिक प्रवास आणि त्यातील शब्दांच्या ताकदीचा कोलाज मांडणारे. राजू सुतार यांनी भोजनेत्तर सत्रात या कलाकृतीची विचार प्रक्रिया उपस्थितांसमोर मांडली. सांगता समारंभासाठी आलेली प्रत्येक व्यक्ती गुरुजींचे शब्द मनात कोरुन घेऊन विचारांची रुजवणूक करण्याचा निर्धार करुन संमेलनात सामिल होत होती. पुण्यातीलच प्रसिध्द चित्रकार रमाकांत धनोकर यांचीही अप्रतिम पोस्टर्स व बॅनर्स प्रांगणाची शोभा वाढवत होते. साने गुरुजींचा साहित्यिक प्रवास दर्शविणारे धनोकरांचे पोस्टर प्रदर्शन नक्कीच मोलाचे. लगतच मांडलेल्या पुस्तकांच्या स्टॉल्स वरील पुस्तक विक्रीसाठी पूरक असलेले. दोन दिवसांच्या भरगच्च वैचारिक आणि सांस्कृतिक मेजवानीत ही पुस्तकं भर घालत होती आणि उपस्थितांच्या परतीच्या सामानाचे वजनही वाढवत होती!

युवा हुंकार अर्थात युवा मेळावा:

साने गुरुजी १२५ अभियान समारोप समारंभात २१ डिसेंबर २०२४ रोजी म्हणजेच पहिल्या दिवशी कुमारवयीन विद्यार्थ्यांसोबत झालेल्या जोशपूर्ण प्रभातफेरी व उद्घाटनानंतरचे सांगता समारंभाचे सत्र होते ते युवांसाठी, युवा मेळावा. साने गुरुजी शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष साजरे करायचे असे ठरल्यावर साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात दोन वर्षांपूर्वी एक दोन दिवशीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत ५० टक्के तरुणाईचा सहभाग होता. साने गुरुजी १२५ अभियान हे नाव या तरुणाईनेच सुचविलेलं. साने गुरुजी जयंतीच्या दिनी जेंव्हा जून २०२३ मध्ये पंढरपूरात जेष्ठ रंगकर्मी आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे प्रथम अध्यक्ष अमोल पालेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या अभियानाची घोषणा करण्यात आली, त्या मेळाव्यालाही युवा उपस्थिती दमदार होती. या अभियानाच्या यशस्वितेत सुरवातीपासूनच युवांचा वाटा महत्वाचा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर साने गुरुजी १२५ अभियानाच्या सांगता समारंभाचे पहिले सत्र हे युवा मेळाव्याचे!

या सत्राची सुरुवात राष्ट्र सेवा दलाचे जेष्ठ साथी बाबा नदाफ यांनी इंद्रायणी पाटील आणि युवा सेवादल सैनिकांच्या साथीने साने गुरुजी लिखित, 'धर्म तो एकही सच्चा, जगतको प्यार देवें हम' आणि 'आता उठवू सारे रान' या गीतांनी केली. या सत्राच्या सुरुवातीला साने गुरुजी १२५ अभियान सांगता समारंभाचे मुख्य संयोजक सुभाष वारे यांनी या समारंभाला आलेल्या उपस्थितांचे स्वागत केले आणि दोन दिवशीय कार्यक्रमाची रुपरेषा सांगितली. समाजात प्रेमभाव वाढीला लावण्याची तीव्र गरज त्यांनी मांडली आणि दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमाची रचना त्या उद्देशानेच झाल्याचे सांगितले. या दोन दिवसात उपस्थितांना एकमेकांशी संवाद करण्यासाठी ठेवलेल्या अवकाशाचाही त्यांनी उल्लेख केला. भरगच्च वैचारिक आणि सांस्कृतिक मेजवानी असलेल्या या समारंभात विशेषत: तरुणांना आणि महिलांना बोलतं करण्याचा प्रयत्न हे या सांगता समारंभाचं वेगळेपण.

युवांना बोलतं करण्यासाठी विविध संवाद कार्यशाळा घेणारे जेष्ठ साथी राजेंद्र बहाळकर यांनी या युवा मेळाव्याचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले. आज बाजाराच्या जाळ्यात अडकलेल्या, विविध आकर्षणांत फसलेल्या युवांबरोबर संवाद वाढवण्याची गरज त्यांनी प्रास्ताविकाच्या सुरुवातीलाच अधोरेखित केली. सोशल मिडियाच्या या जगात युवांना पोर्नोग्राफीत अडकवले जात आहे, याबद्दल बहाळकर यांनी चिंता व्यक्त केली. शिक्षणासाठी समाजातील विविध घटकांना सरकारी पातळीवर असलेल्या स्कॉलरशीप

मिळवण्यासाठी हमिद दलवाई इस्लामिक रिसर्च इंस्टिट्यूटच्या माध्यमातून युवांना मदत करण्यासाठी विविध ठिकाणी केंद्र चालवले जाते. या युवा मेळाव्याच्या निमित्ताने बहाळकर यांनी या स्कॉलरशीप मिळण्यात ज्या असंख्य अडचणी येतात त्या सोडविण्यात तुमच्याबरोबर आहोत, असा विश्वास युवांना दिला.

या सत्रात विविध ठिकाणच्या युवांनी प्रेम आणि मैत्री या विषयावर मांडणी केली. साने गुरुजींनी जगाला प्रेम अर्पावे म्हटलय, आजची तरुणाई या प्रेमाबद्दल कशी मांडणी करते हे या मेळाव्यात ऐकायला मिळाले. शेतकरी जेव्हा शेतीत बी पेरतो तेव्हापासूनच त्याच्यावर जीवापाड प्रेम करु लागतो हे सांगणारी तरुणाई भगतसिंगांनी "मै जब इश्क लिखने जाता हूँ, तो इन्कलाब लिखा जाता है" अशा शब्दात प्रेमाची व्याख्याही मांडत होती. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मैत्रीविषयीचेही मुद्दे मांडले. खरी मैत्री ही केली जात नाही तर ती होते. ती होताना समोरच्याची जात, लिंग, धर्म, चेहरा बघीतला जात नाही. दोस्ती जिंदाबादच्या नाऱ्यात वैयक्तिक दोस्तीबरोबरच सामाजिक कामातील दोस्तीबद्दलही युवा बोलत होते. या मांडणीत पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी फलक खान, सृष्टी गवळी, अंजली केखावाले, रिझवान खान हे सामिल झाले होते. तसेच भारत थोरात, बीडचे सारंग पिटलेवाड, लातूरहून रविंद्र लामखेडे, संगमनेरच्या ऋतूजा लहाने, बुलढाणाचे संघर्ष पवार, नंदूरबारहून राज कांबळे आणि वाशिमहून मुस्कान नदाफ, हेरवाड यांनीही भाग घेतला.

समारोप करताना या सत्रात युवकांचा आवाज ऐकून घेतला म्हणून उपस्थितांचे अभिनंदन करत आणि आभार मानत प्रमुख वक्ते साने गुरुजी १ २ ५ अभियानाचे राष्ट्रीय संयोजक डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी आनंद व्यक्त केला आणि आपला आवाज मांडणाऱ्या तरुणाईचेही अभिनंदन केले. आव्हाने पेलतो तो युवा अशी व्याख्या करुन त्यांनी युवांनी आपल्या परिघाबाहेरील युवांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न समजून घ्यावेत आणि साने गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे म्हणत संयमाने, न चिडता त्यांच्याही संवाद साधावा, पुस्तकांबरोबरच आपला भवतालही वाचावा आणि भान विसरुन एखाद्या विषयाला, आव्हानाला भिडावे पण भान विसरताना अग्रक्रमही ही ठरवावा असे आवाहन त्यांनी केले. आपला समाज आपल्याला शिकवत असतो आणि म्हणून समाजाबरोबरची आपली बांधिलकी जन्मापासूनची आहे. जिद्दीने भवताल बदलण्याचा प्रयत्न करणारा युवा महत्वाचा आहे असेही ते म्हणाले. आजच्या वातावरणात व्यक्त होण्यावर बंधन येत आहेत असे सांगून तरुणाईला व्यक्त व्हायला वाव देण्यासाठी समाजात वातावरण तयार करण्याचे वयुवकांच्या अभिव्यक्तीला विधायक वळण द्यायचे प्रयत्न करायला हवेत असे आग्रही मत डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी याप्रसंगी मांडले. साने गुरुजी १ २ ५ अभियानाच्या निमित्ताने भरविण्यात आलेल्या या युवा मेळाव्याच्या निमित्ताने युवकांच्या प्रश्नांवर बोलुचया त्याचबरोबर युवकांना त्यांच्या भवतालातील वंचितांच्या, आदिवासींच्या, विस्थापितांच्या प्रश्नांचीही ओळख करुन देऊया. प्रेमाचा, परिवर्तनाचा, माणूसकीचा विचार रुजवूया, फुलवूया आणि सगळे मिळून घडवूया अशा सकारात्मक शब्दांत डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी या युवा मेळाव्याचा समारोप केला.

मेळाव्याला विशेष उपस्थित साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष प्रमोद निगुडकर यांनी, स्वराज्याचे सुराज्य कसे होईल याचा विचार आंतरभारतीच्या माध्यमाने करणारी १ ९ ५ ० साली गेलेली व्यक्ती आज आपण का आठवतोय, साने गुरुजी आज असते तर त्यांनी कोणता रॅप केला असता, रिल कोणते केले असते, फेसबुकवर काय लिहिले असते हा विचार तरुणांनी करण्याचे आवाहन केले. साने गुरुजींच्या विचारांवर चालणारी अभिव्यक्त होण्याची केंद्रे अनेक ठिकाणी आहेत. तरुण म्हणून आपली भूमिका काय असावी, साने गुरुजी कसे व्यक्त झाले असते हे समजून घेण्यासाठी साने गुरुजी स्मारकाच्या छावणीत युवांनी यावे असे आमंत्रण त्यांनी दिले. तीन वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाल्यावरच जागे न होता अशा घटना न घडणारा समाज निर्माण व्हावा यासाठी झटण्याचा निश्चय करावा अशा शब्दांत त्यांनी उपस्थित युवांना आवाहन केले. हे सत्र क्युरेट केलेल्या राजेंद्र बहाळकर यांना धन्यवाद देत निगुडकरांनी साने गुरुजींनी सांगितलेली आतंरभारती, साने गुरुजींनी सांगितलेली भारतीय संस्कृती काय आहे हे सांगण्याचं बळ इथून आपण घेऊन जाऊया अशी आशा व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. संजय मंगला गोपाळ लिखीत "लोकशाही समाजवादी चळवळ पुन्हा गतीमान करणे आवश्यक'' या सृजन प्रकाशनाच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. लोकशाही समाजवादी विचारांवर निष्ठा असणाऱ्यांसाठी पथप्रदर्शक असणाऱ्या ह्या पुस्तकाला गजानन खातू यांची प्रस्तावना लाभली आहे. या

सत्रात सामिल झालेल्या सर्व जिंदादिल साथींचे इचलकरंजी येथील युवा साथी रोहित दळवी यांनी आभार मानले. अशा प्रकारच्या युवा संवाद मेळाव्याचे आयोजन साने गुरुजी १ २ ५ अभियानाच्या समारोपानंतरही विविध ठिकाणी करण्यात यावे असा सूर नंतर उमटत राहिला, हीच या मेळाव्याची यशस्विता!

मेरी बात सुनो: सर्वधर्मीय महिला संवाद मेळावा:

दुपारच्या भोजनोत्तर सत्रात सर्व धर्मीय महिला संवाद मेळावा संपन्न झाला. साने गुरूजींचा भारतीय संस्कृतीचा, इस्लामी संस्कृतीचा अभ्यास होता आणि त्यात त्यांना भारतीयांच्या एकत्रित जगण्याला तसेच विकासाच्या वाटेवर एकत्रित चालण्याला मदत करणारे अनेक दुवे सापडत होते. समाजाला जर आपला विकास साधायचा असेल तर विविध धर्माच्या, विविध भाषा बोलणाऱ्या समुदायातील लोकांनी मोकळेपणाने एकमेकांशी बोलणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या समाजातील महिला जेव्हा एकमेकाशी आपलेपणाने आणि खुलेपणाने बोलतात व एकमेकाचं जगणं समजून घेतात तेव्हा त्या निश्चितपणे हातात हात घालून पुढे जाण्याचाच विचार करतात. ही एकमेकांशी बोलण्याची साखळी घट्टपणे पुढे नेण्यासाठी या महिला मेळाव्याचा घाट घातला गेला.

कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत, सांस फाऊंडेशन, हमीद दलवाई रिसर्च इन्स्टिट्यूट, जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आदी संघटनांशी संबंधित महिला या मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या. वैशाली उषा अशोक, इला दलवाई आणि राजेंद्र बहाळकर यांनी मेळाव्याच्या प्रचार प्रसारासाठी वस्त्या वस्त्यांमध्ये बैठका घेतल्या. म्हाडा वसाहत, हडपसर; दांडेकर पुल; आंबेडकर नगर, मार्केट यार्ड; मुजावर वस्ती, मंगळवार पेठ; कोंढवा; चुडामण तालीम परिसर, गणेश पेठ इत्यादी ठिकाणांहून कष्टकरी महिला या मेळाव्याला आल्या होत्या. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या सरुबाई वाघमारे व शोभाबाई बनसोडे यांनी "पाडू चला रे भिंत ही मधे आड येणारी" हे गाणं सादर करुन मेळाव्याची सुरुवात केली. आजच्या कठीण वातावरणात संवादाचा पूल बांधण्यासाठी धर्म जाती भाषा प्रांत यांचा अडसर दूर करणे हा या महिला मेळाव्याचा उद्देश असल्याचे या मेळाव्यासाठी मेहनत घेणाऱ्या इला दलवाई यांनी आपल्या प्रास्ताविकेत सांगितले. या महिलांना स्वत:बद्दल, त्यांच्या जगण्याबद्दल, त्यात येणाऱ्या अडचणींबद्दल बोलायचं आहे आणि म्हणूनच या मेळाव्याचं शिर्षकच 'मेरी बात सुनो' आहे असे इलाताईंनी सांगत उपस्थितांची उत्सुकता वाढवली.

वस्त्यांत राहणाऱ्या या महिलांचे जगणे काय आहे, वस्तीपातळीवर त्यांना काय ताण तणाव आहेत, रोजच्या आयुष्यातला संघर्ष काय आहे हे सांगण्यासाठी या महिला आल्या होत्या. तसेच त्यांच्या जगण्यातले आनंददायी क्षण, एकुणच त्यांचं जगणं याबाबत त्यांच्या भावना त्या व्यक्त करत होत्या. या मेळाव्याचे सूत्रसंचालन वैशाली उषा अशोक हिने केले तर समाजजीवनाचा चांगला अभ्यास असणाऱ्या पत्रकार व लेखिका हीना कौसर खान यांनी उपस्थित महिलांना विविध विषयांवर बोलते केले. जेष्ठ सामाजिक नेते सत्यशोधक डॉ. बाबा आढाव यांच्या विशेष उपस्थितीत या महिला व्यक्त होत होत्या. सुरैया शेख यांनी संवादाला सुरुवात करतानाच मुस्लिम महिला बाहेर पडायला हव्यात असे आग्रही मत व्यक्त केलं. आज मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. म्हणून मुलींनी शिकावं आणि घराबाहेर पडावं यासाठी आपण सर्वांनी वातावरण तयार करायला हवं असं मत मांडले. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या सरुबाई वाघमारे यांनी वयाच्या दहाव्या वर्षापासून कचरा वेचलाय असं सांगत माणूस म्हणून जगण्यासाठी एकी दाखवली पाहिजे, संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही असे स्पष्ट मत मांडले. संघटना बाईच्या आयुष्यात आली तर बाईच्या जीवनात होणाऱ्या

५ पुस्तके आणि ३ कॅलेंडर्स चे प्रकाशान

सांगता समारंभाच्या दोन दिवसांत पाच पुस्तकं आणि तीन कॅलेंडर्स प्रकाशित करण्यात आली. सृजन प्रकाशनची 'माझ्या मनातील आदर्श शाळा - साने गुरुजी', 'श्यामच्या आईची काव्यचित्रे' - सुनिता मगदूम, 'लोकशाही समाजवादी चळवळ गतीमान करणे आवश्यक' – डॉ. संजय मंगला गोपाळ तसेच राष्ट्र सेवा दल प्रकाशित डॉ. सुभाष गवई यांचे 'पंढरपूर विठ्ठल मंदिर प्रवेश सत्याग्रह लढा' आणि साने गुरुजी कथामालेचे बी. आर. माडगुळकर यांनी द्वारकानाथ लेले यांचे इंग्रजीत भाषांतर केलेले 'Sane Guruji' ही ती पाच पुस्तके होत. राष्ट्र सेवा दल पुणे जिल्हा, नर्मदा जीवनशाळा व घर बचाओ घर बनाओ आंदोलन यांची कॅलेंडर्सही प्रकाशित करण्यात आली.

बदलाबद्दलही सरुबाई बोलल्या. सांस फाऊंडेशनच्या आफरिन खान यांनी वस्तीतील मुलांच्या शिक्षणाबद्दल बोलताना स्कॉलरशीप बद्दल वस्तीतल्या लोकांना काहीच माहित नाही याबद्दल दु:ख व्यक्त केले. स्कॉलरशीपसाठी संबंधित कागदपत्र गोळा करण्यात आलेल्या अडचणींबद्दलही त्या बोलल्या. कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतच्या शोभाबाई बनसोडे यांनी संस्थाच आमचं माहेर आहे असं म्हणत संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. वस्तीपातळीवर होणाऱ्या बैठका आणि विविध प्रश्न सोडवताना संस्थेचा मिळणारा पाठिंबा याबद्दलही शोभाबाई मनापासून बोलल्या. कचरावेचक मुन्नी शेख यांनी आमच्या जातीत हे काम करत नाहीत पण मला जगण्यासाठी करावं लागलं असं सांगतानाच या कामामुळेच नवऱ्याने सोडून दिल्यावरही मुलींची शिक्षणं व लग्न करता आली याबद्दल समाधान व्यक्त केले. कमल शिंदे यांनी वैयक्तिक प्रश्नाबरोबरच वस्तीतील गंभीर प्रश्नांकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. वस्तीत दारूचा प्रश्न जरी मुस्लिम घरांत नसला तरी इतर ठिकाणी आहे त्यामुळे एकही महिला सुखी नाही याबद्दल त्यांनी दु:ख व्यक्त केले. वस्तीबाहेरचा वाहता रस्ता, वस्तीतील अंगणवाडी, बालवाडीचा प्रश्न याबरोबरच चौकातल्या तरुण मुलांच्या मारामाऱ्या व त्यामुळे होणारा पोलिसांचा त्रास याकडेही कमलताईंनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

वस्तीतल्या बायांबरोबरच उपस्थित कार्यकर्त्यांतील बडवानी मध्यप्रदेशहून आलेल्या नर्मदा बचाव आंदोलनाच्या कार्यकर्त्या कमलाबहेन यादव यांनीही या मेळाव्यात संवाद साधला. नर्मदा खोऱ्यातील विस्थापितांच्या पुनर्वसासाठी केलेल्या संघर्षाबाबत सांगताना त्यांनी महिला जे करु इच्छितात ते करु शकतात असा विश्वास व्यक्त केला. नदी हे जीवन आहे. नदी संपली तर किती प्रश्न निर्माण होतील असे सांगून आपापल्या भागातील नदी वाचवण्याचे आवाहनही कमलबहेन यांनी केले. सगळ्या ठिकाणच्या महिलांचे प्रश्न कमी अधिक सारखेच असतात असे सांगून महिलांनी संघर्षाची तयारी ठेवायला हवी असे मत मांडले.

हिना कौसर खान यांनी महिलांना बोलतं करण्यासाठी सरकारकडे कोणती मागणी कराल हा प्रश्न विचारला. त्यावेळी रेशन आणि पेन्शन या दोन गोष्टींचा सर्वच महिलांनी उल्लेख केला. पुरेसं रेशन, चांगल धान्य मिळावं, नवीन रेशन कार्ड काढतानाच्या अडचणी दूर व्हाव्यात, वस्तीजवळ शाळा असावी, शाळेतली खिचडी चांगल्या दर्जाची असावी, वयाच्या ६५ वर्षावरच्यांना पेन्शन मिळावे अशा अनेक मागण्या महिलांकडून पुढे आल्या. रेशन आणि पेन्शन या दोन गोष्टींसाठी एकत्र यायला हवे असा आग्रह महिलांच्या बोलण्यात व्यक्त झाला. वस्तीपातळीवर कोणते प्रश्न भेडसावतात यावर दारुचा प्रश्न व मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आणि त्यामुळे वस्तीत होणारी भांडणं व पोलिसांचा त्रास यावर सर्वच महिलांचे एकमत होते. मेळाव्याच्या समारोपात त्यांनी महिलांच्या संवादाचा आढावा घेतला. महिला संवाद मेळाव्यात सर्व धर्मीय महिला या पुरुषी व्यवस्थेबाबत बोलत होत्या याकडे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. महिलांच्या संवादात समस्यांच्या केंद्रीभूत स्त्री नाही तर पुरुषी व्यवस्था होती हे सांगतानाच हिना कौसर खान यांनी महिलांच्या बोलण्यात साथ, सोबत, सहजीवन हे मुद्देच नव्हते याबद्दल खंत व्यक्त केली. वस्तीपातळीवर एकमेकांप्रति सहजभाव, सलोखा हा सहज कृतीतून व्यक्त होत असतो असे सांगून वस्तीच्या पातळीवर जगण्याचे मूलभूत प्रश्न भेडसावत असल्याने विद्वेषाच्या राजकारणापासून त्या दूर असतात असे प्रतिपादन केले. संघटीत व्हायला लागल्यावर हक्कांसाठी बाया भांडू लागल्या आहेत, एकता आणि संघटनेचे महत्व हे त्यांना समजलं आहे हे आशादायी चित्र आहे असेही हिना कौसर खान या प्रसंगी म्हणाल्या. छोट्या प्रश्नांत या महिलांचं जगणं अडकलं आहे हे समजून घेतलं पाहिजे आणि त्यासाठी असे मेळावे आयोजित करुन महिलांना ऐकून घेतले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

जेष्ठ सामाजिक नेते सत्यशोधक बाबा आढाव यांनी सुरुवातीसच आयोजकांना शाबासकी देतांना असा मेळावा हा बहुदा पहिलाच असावा. या मेळाव्याला मला बोलावून तुम्ही ९५ व्या वर्षी माझे आयुष्य अजून २ वर्षानी वाढवले! पुढे त्यांनी वस्तीपातळीवर सलोखा असला तरी सध्याच्या वातावरणात वस्तीपातळीवर लोकांना हिंदू मुसलमान भेद निर्माण व्हायची खूप भीती वाटते. त्या बद्दल या बाया बोलल्या नसल्या तरी त्यांच्या मनात हे आहेच. अशा प्रकारच्या मेळाव्यात ही भीती व्यक्त करता यायला हवी. तसा विश्वास त्यांना द्यायला हवा अशी मांडणी केली. लाडकी बहीण योजनेबद्दल बोलताना, एका बाजूला पैसे दिले आणि दुसरीकडे रेशन बंद केले हे राजकारण महिलांना समजले पाहिजे हे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी आहोत, विचारांचे

बंड करुन प्रश्न सोडवण्याचा निर्धार तुम्ही केला पाहिजे अशा शब्दांत बाबांनी महिलांचे मनोधैर्य वाढवले. बाईमाणसाला संधी दिली तर ती संधीचं सोनं करुन दाखवते, जरा आम्हाला स्वातंत्र्य द्या असा आग्रह महिलांनी सर्वच पातळी धरला पाहिजे असा कानमंत्र त्यांनी महिलांना दिला. निवडणूकीत चाललेल्या पैशाच्या धुमाकुळाबद्दल राग व्यक्त करत बाबांनी निवडणूक काळात तुम्ही मांडलेल्या प्रश्नाची चर्चा होत नाही त्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे असे आग्रही मत मांडले. सरकार काय करेल या भ्रमात न राहता आता आपल्याला वस्तीपातळीवरच काम केले पाहिजे असे ठाम मत बाबांनी व्यक्त केले. सत्यमेव जयते म्हणजे मला सत्य शोधायचा अधिकार आहे असे सांगून त्यांनी उपस्थित सर्वांकडून महात्मा फुले यांचा सत्याचा अखंड गाऊन घेतला आणि सत्याचा आग्रह व कास धरण्यास सांगितले. दोन तास चाललेला हा महिला मेळावा या अभियानाच्या समारोप समारंभातला एक कार्यक्रम जरी असला तरी साने गुरुजी १२५ अभियानाच्या निमित्ताने राबविल्या गेलेल्या उपक्रमाचा पुढचा टप्पा आहे. भविष्यकाळात अशा प्रकारचे आंतरधर्मीय महिला मेळावे भरवून संवादाची कवाडे खुली करण्याचा प्रयत्न करण्याचा निश्चय करुन कार्यकर्ते पुढील कार्यक्रमाकडे वळले.

मनाला खरवडून काढणाऱ्या वास्तवदर्शी लघुपटांचं प्रदर्शन:

साने गुरुजी १२५ अभियानाच्या सांगता समारंभातील युवा मेळाव्यात साने गुरुजी आज असते तर कसे व्यक्त झाले असते असा प्रश्न चर्चीला गेला. साने गुरुजींनी अभिव्यक्त होण्यासाठी साहित्याचे सर्व प्रकार हाताळले. गोष्टी, कथा, कादंबरी, वैचारिक लेखन, कविता, अनुवाद या सर्व साहित्य प्रकारात त्यांनी विपुल साहित्य निर्मिती केली. आणि त्यांनी आपले विचार सर्वदूर पोहेचवले. गुरुजी गेल्यावरही ७५ वर्षानंतरही ते आपल्याला त्यांच्या साहित्यातून भेटतच राहतात. गुरुजी आज असते तर साहित्याबरोबरच आज प्रचलित व लोकप्रिय असलेल्या दृक्श्राव्य माध्यमातून निश्चितच व्यक्त झाले असते. आपले विचार प्रभावीपणे सर्वच वयोगटातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी फिल्म हे माध्यम निश्चितच निवडले असते. आणि म्हणूनच लघुपटांच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या तरुण दिग्दर्शकांच्या निवडक लघुपटांचे स्क्रिनिंग या सांगता समारंभाच्या निमित्ताने करण्यात आले. प्रसिध्द दिग्दर्शक सुनिल सुखथनकर आणि शिल्पा बल्लाळ यांनी या सत्राची जबाबदारी घेतली होती. विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय महोत्सवांत प्रदर्शित झालेले व नावाजलेले पुरस्कारप्राप्त चार लघुपट यावेळी दाखविण्यात आले. यावेळी त्या लघुपटांचे दिग्दर्शकही आवर्जून उपस्थित होते. जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा दळवी यांच्या विशेष उपस्थितीत पार पडलेल्या या सत्राचे संचालन सुनिल सुकथनकर यांनी केले.

भट्टी- शिवाजी करडे, दळण- उमेश मालन, शिमगा- सनत गानू, रेखा- शेखर रणखांबे या चार लघुपटांचे स्क्रिनिंग झाले. शिवाजी करडे, उमेश मालन, सनत गानू हे तीन दिग्दर्शकही या प्रसंगी उपस्थित होते. चारही लघुपटांना उपस्थितांची मिळालेली दाद ही मनापासून अस्वस्थ होऊन दिलेली. साने गुरुजींच्या साहित्यात तत्कालिन समाजवास्तवाचे चित्रण असायचे व त्या साहित्यात वाचकांना विचार करायला लावायची ताकद होती. तशाच ताकदीचे हे चार लघुपट सुनिल सुखथनकर आणि शिल्पा बल्लाळ यांनी निवडले होते. तळागाळातल्या लोकांच्या जगण्यातलं वास्तव, पुरुषप्रधान मानसिकतेचं चित्रण, जातवास्तवाचे आंतरप्रवाह या सर्वांचे वास्तवदर्शी चित्रण करणारे हे लघुपट संवेदनशील मनाला खरवडून काढणारे. सुन्न करणारा हा अनुभव घेतल्यावर प्रेक्षकांशी संवाद साधला तो आदिवासींबरोबर गेली ४५ वर्ष काम करणाऱ्या ॲड. सुरेखा दळवी यांनी. हे लघुपट बघताना आणि नंतरही इतका त्रास होतो आहे मग असे चित्रपट का बघायचे? या लघुपटांचं प्रयोजन काय? ह्या प्रश्नांची उत्तरं या अभियानातच आपण शोधली पाहिजेत अशी सुरेखाताईंनी सुरुवात केली. हे भयाण वास्तव बदलणं हेच गुरुजींना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल आणि त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत असे आवाहनही त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. डोळ्यासमोर घडणाऱ्या घटनांचे वास्तव दाखवणारे दिग्दर्शक इथे आहेत याबद्दल आनंद व्यक्त करत सुरेखाताईंनी या घटना म्हणजे तळागाळात काम करतानाचा प्रत्यक्ष अनुभवच आहे असे सांगितले. पुरुषसत्तेचे वास्तव दाखवतानाच त्याला भिडणारी बाई या लघुपटांत उभी केलीय, जातीच्या वर्चस्वाचा समाजमनात रुजलेला अहंकार अशी निरक्षण त्यांनी नोंदवली. समाज वास्तवातील पायऱ्या अजूनही आहेत, ती उतरंड चूकीची आहे हे लघुपट पाहात असताना जाणवणं, हे वास्तव बदलण्यासाठी वास्तवाला भिडावसं वाटणं या प्रेरणा साने गुरुजींच्या आहेत. त्यांच्या विचारांवर चालण्यासाठी उद्युक्त करणाऱ्या आहेत असे सांगत सुरेखाताईंनी हे लघुपट

बनवणाऱ्या दिग्दर्शकांचे व या सत्राचे संयोजन करणाऱ्या सुनिल सुकथनकर यांचे अभिनंदन केले. अस्वस्थ करणाऱ्या या अनुभवाची चर्चा करतच रात्री कार्यकर्ते जेवत होते, पुढच्या योजना आखत होते.

साने गुरुजी विचार दर्शन परिसंवाद:

साने गुरुजी १ २ ५ अभियान सांगता समारंभ कार्यक्रमात 'साने गुरुजी विचार दर्शन' हा परिसंवाद २ २ डिसेंबर २ ० २ ४ रोजी आयोजित केला होता. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे संस्थापक जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते गजाजन खातू यांच्या विशेष उपस्थितीत हा परिसंवाद पार पडला. या परिसंवादात डॉ. चैत्रा रेडकर (तत्वज्ञ साने गुरुजी), साधनेचे संपादक विनोद शिरसाठ (साने गुरुजींची सामाजिक न्यायाची कल्पना), कलिम अजीम (साने गुरुजींचे साहित्य) आणि संजय रेंदाळकर (सेनानी साने गुरुजी) या वक्त्यांनी साने गुरुजींचे बहुआयामी व्यक्तीमत्व उलगडून दाखविले. या परिसंवादाचे प्रास्ताविक युवा साथी अमोल अरोटे यांनी केले तर सूत्र संचालन संयोजन समिति सदस्य मनीषा पाटील यांनी केले.

परिसंवादाची सुरुवात इचलकरंजीचे साथी संजय रेंदाळकर यांनी केली. सेनानी साने गुरुजींचा पट मांडताना त्यांनी परिवर्तनावर विश्वास ठेवणाऱ्या साने गुरुजींपासून सुरुवात केली. समाज परिवर्तनासाठी गुरुजींनी तन मन धन इतकेच काय तर जीवनही अपर्ण केले असे सांगून, ''नवभारताची आशा शालेय विद्यार्थ्यांमधे दिसते'' असे म्हणाऱ्या साने गुरुजींचे विचार छोट्या संवाद शाळांच्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचवण्याची गरज रेंदाळकर यांनी अधोरेखित केली. इतिहासाच्या पुनर्मांडणीत समाजवाद्याचं योगदान पुसलं जाईल याची भिती व्यक्त करतानाच साथी रेंदाळकर यांनी छोटे छोटे त्याग करण्यासाठी कृती कार्यक्रम द्यायला हवेत यावर त्यांच्या मांडणीत भर दिला. 'आहे हा क्षण वाया न घालवणे' हे साने गुरुजींचे सेनानी असल्याचे लक्षण आहे हे सांगत रेंदाळकरांनी गुरुजींच्या जीवनाचा धावता आढावा घेतला. गुरुजींनी केलेले प्रचंड काम हे त्यांच्या लेखनापर्यंत मर्यादित नव्हते तर ते आंदोलनकारी सत्याग्रही समतेचे पुरस्कर्ते स्वातंत्र्यवीर सेनानी होते असे गैरवोद्गार त्यांनी काढले. अमळनेर मधील टोल विरोधी आंदोलन, प्रताप मिल कामगारांचा लढा, पंढरपूर मंदिर प्रवेश उपोषण या सारख्या गुरुजींच्या आंतर्बाह्य संघर्षाबद्दल त्यांनी उपस्थितांना अवगत केले. घटना नावाची गोष्ट जरी प्रत्यक्षात आली तर त्याच्या अंमलबजावणीसाठी मनाला वेळ दिला पाहिजे ह्यासाठी समतेचे विचार जनमानसात पोहेचणे गरजेचे आहे आणि म्हणून पंढरपूर मंदिर प्रवेशाआधी त्यांनी चार महिने महाराष्ट्रभर झंझावाती दौरा करुन समतेचा विचार तळागाळात पोहोचवला याची रेंदाळकरांनी आठवण करुन दिली. आजच्या धार्मिक धृविकरणाच्या काळात जयाला धर्म जो प्यारा तयाने प्रेममय व्हावे हे आयुष्यभर आपण पाळूया असे आवाहनही रेंदाळकर यांनी केले.

साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ यांनी परिसंवादात 'साने गुरुजींची सामाजिक न्यायाची कल्पना' या विषयावर मांडणी केली. वयाच्या पंचविशीत १ ९ २ ४ साली साने गुरुजींनी नामदार गोखले हे पहिले पुस्तक लिहिले. त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे पुढील पंचवीस वर्ष केलेल्या सामाजिक कामाची सामाजिक स्विकार्हता पुढची ७५ वर्ष टिकून राहणे ही खूप महत्वाची व दुर्मिळ बाब आहे असे मत शिरसाठ यांनी मांडले. साने गुरुजींनी त्यांच्या उण्यापुऱ्या ५ ० वर्षांच्या आयुष्यात १ २ ५ पुस्तकं लिहिली. त्यातील 'क्रांतीच्या मार्गावर' या पुस्तकाचा शिरसाठ यांनी विशेष उल्लेख केला. हे पुस्तक १ ९ ४ २ साली भूमिगत असतानाची पत्रकं एकत्रित करुन काढलेले आहे. या पुस्तकात इंग्रज सरकारवर दाहक प्रहार केलेला आहे. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, सरकारी नोकर, पोलिस या सर्वांना स्वतंत्रपणे उद्देशून काढलेल्या पत्रकांत क्रांतीचे आवाहन केले आहे आणि कम्युनिस्ट व हिंदुत्ववाद्यावर दाहक टीका केली आहे. १ ९ ४ ७ नंतरच्या साने गुरुजींबद्दल समता सेनानी म्हणूनच शिरसाठ बोलतात. समाजातील विषमता हा मुख्य विषय घेऊनच गुरुजी पंढरपूर मंदिर प्रवेश लढ्यात उतरले. जानेवारी ते एप्रिल १ ९ ४ ७ या चार महिन्यात साने गुरुजींनी प. महाराष्ट्रात ४ ० ० सभा घेतल्या. जवळपास ३ ० ० गावातील मंदिरे खुली झाली. यावेळची गुरुजींची भाषा ही अस्पृश्यता नष्ट करण्याची भाषा आहे. या कामात कुठेही तडजोड नाही. त्यावेळच्या त्यांच्या लिखाणात व भाषणांत शब्दातील धग जाणवते असेही शिरसाठ सांगतात. १ ५ ऑगस्ट १ ९ ४ ८ रोजी सुरू केलेल्या साधना साप्ताहिकाचं ब्रीदवाक्यच मुळी 'विषमता आणि वैरभाव नष्ट करण्याची थोर साधना आपणास करावयाची आहे' हे आहे जे साने गुरुजींची सामाजिक न्यायाची कल्पना स्पष्ट करते आणि या स्पष्ट भूमिकेमुळेच साने गुरुजींची स्विकार्हयता अजूनही टिकून आहे असे स्पष्ट मत

विनोद शिरसाठ यांनी या परिसंवादात मांडले.

कलीम अजीम या तरुण अभ्यासू लेखकाने साने गुरुजींचे साहित्य या विषयावर परिसंवादात भाग घेतला. साने गुरुजींच्या 'इस्लामी संस्कृती' या पुस्तकावर बोलायला मला जास्त आवडेल असं सांगत साने गुरुजींनी मांडलेला इस्लाम आणि घरात आचरणात आलेला इस्लाम हे पूर्णपणे वेगळा आहे अशी मांडणी कलीम अजीम यांनी केली. इस्लामी संस्कृतीतील सामाजिक क्रांतीची भूमिका समजून घेणे हे या पुस्तकाचे उद्दिष्ट असल्याचे सांगत कलीम अजीम यांनी "पुरोहितशाही विरुध्दचे पहिले बंड हे प्रेषित पैगंबर यांनी केले'' हे साने गुरुजींचे विधान उद्धृत केले. या पुस्तकातला प्रेषितपूर्व मागासलेला काळ, प्रेषितकालीन समृध्दीचा आणि पुरोहितशाही विरोधाचा काळ तसेच विधवा विवाह व मुलींच्या जन्माला अभय मिळण्याचा काळ या सर्वांचा उल्लेख कलीम अजीम यांनी केला. ज्या संस्कृतीबद्दल अत्यंत वाईट बोलण्याची लाट आलेली आहे त्या संस्कृतीबद्दल साने गुरुजी काय म्हणताहेत हे प्रत्येकाने वाचले पाहिजे व त्या विचारांचा प्रसार केला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

साने गुरुजींच्या विचारांच्या अभ्यासक, लेखिका आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाच्या विश्वस्त डॉ. चैत्रा रेडकर यांनी 'तत्वज्ञ साने गुरुजी' हा विषय परिसंवादात मांडला. साने गुरुजींची विचारधारा ही भारतीय संस्कृतीतील विविध विचारधारा, संतपरंपरा, गांधीवादी, समाजवादी समतेच्या विचारधारांचा आपापले अस्तित्व टिकवून समन्वय साधणारा एक मेळ आहे असे गौरवोद्गार चैत्रा रेडकर यांनी या परिसंवादात बोलताना काढले. विविध वाद्य वाजवताना सुंदर संगीत तयार होतं तो ताळमेळ या विचारांत आहे असेही त्या म्हणाल्या. गुरुजींच्या लिखाणातल्या 'सोन्या मारुती' आणि 'संध्या' या दोन कादबऱ्यांचा चेत्रा रेडकर यांनी मांडणीत विशेष उल्लेख केला. सोन्या मारुतीत धर्म न नाकारता धर्मांध शक्तीच्या विरुध्द लढणे आहे तर संध्या या कादंबरीत गुरुजी मार्क्सवाद आणि गांधीवाद या दोन विचारधारांमध्ये संवाद करताना वा मेळ घालताना दिसतात. ३० आणि ४० च्या दशकातीलं राष्ट्रवाद समताधिष्ठित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या लिखाणापुरते ते थांबत नाहीत तर श्यामची पत्रे या वसंतास लिहिलेल्या पत्रातून ते जागतिक साम्यवादाचीही चर्चा करतात. राष्ट्रवादाला साम्यवादाच्या अजेंड्याकडे आणताना व साम्यवादाला राष्ट्रवादाकडे नेताना गुरुजी राष्ट्र उभारणी ही अस्मितेसाठी नाही तर समताधिष्ठीत समाजव्यवस्थेसाठी आहे अशी स्पष्ट भूमिका घेताना दिसतात.

"स्वातंत्र्य आणि समता यांचा मेळ घालतानाच धर्म व विवेक यांचाही मेळ घालताना गुरुजी दिसतात. श्रध्दा आणि विवेक हे परस्परविरोधी नाहीत आणि म्हणून विवेकवाद कर्कश्य बुध्दीप्रामाण्यवादी वा व्यवहारवादी होता कामा नये अशी जाणीव गुरुजी आपल्याला करुन देतात", अशी मांडणी चैत्रा रेडकर करतात. तत्वज्ञ साने गुरुजी हे कोणत्याही परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये प्रस्थापिताची भूमिका काय असेल? या प्रश्नाचे उत्तर देताना पंढरपूरचा मंदिर प्रवेश लढा उभारताना दिसतात. जातीची बिरुदी मिरवणे ही आपल्यातली प्रवृती आहे. मनातली घाण गेली तरच बाहेरची घाण जाईल यासाठी माझा हा लढा आहे हे गुरुजींचे वाक्य आहे याची आठवण चैत्रा रेडकर आपल्याला करुन देतात. त्यामुळे आंबेडकरांना विरोध नाही तर माझा लढा त्यांना पूरक आहे या गुरुजींच्या भूमिकेचा त्या पुनरुच्चार करतात. कोणत्याही परिवर्तनाच्या प्रक्रियेत आपलं स्थान वेगळं आहे याचं भान असावं ही गुरुजींची भूमिका होती. वेगवेगळ्या संघर्षाच्या लढ्यात आपल्याला हे भान असावं हेच तत्वज्ञ साने गुरुजींना समजून घेण्यातलं सार आहे अशा शब्दांत चैत्रा रेडकर यांनी आपले विचार मांडले.

साने गुरुजी १२५ अभियान म्हणजे साने गुरुजींच्या तरुणाईची शताब्दी साजरी करणं आहे, अशा शब्दांत साने गुरुजी १२५ अभियानाची दिशा गजानन खातू यांनी स्पष्ट केली. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे संस्थापक जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते गजानन खातू यांच्या विशेष उपस्थितीत पार पडलेल्या या परिसंवादात बोलतांना ते म्हणाले, भविष्यातील आव्हानांचा वेध घेत कार्यकर्त्यांनी आपली वाटचाल चालू ठेवावी. वातावरण बदल, जैवविविधतेच ऱ्हास अशा सारखी नवनवीन आव्हानं ही आपल्या आव्हानांच्या परिप्रेक्षात आहे का? असा सवाल विचारत नवे विचार, नवी आव्हानं पेलण्यास कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे तरच साने गुरुजींच्या तरुणाईची शताब्दी खऱ्या अर्थाने साजरी होईल असे आवाहन त्यांनी केले. यावेळी साने गुरुजींचे पंढरपूर मंदिर प्रवेश सत्याग्रह प्रकरण उजागर करणारे राष्ट्र सेवा दल प्रकाशित डॉ. सुभाष गवई यांचे पंढरपूर विठ्ठल मंदिर प्रवेश सत्याग्रह लढा हे पुस्तक सहभागींचे हस्ते प्रकाशित करण्यात आले.

सांस्कृतिक अभिव्यक्ती व पुस्तक प्रकाशन:

साने गुरुजी जीवनदर्शन परिसंवादाच्या पूर्वी २२ तारखेच्या सकाळी उपस्थित कार्यकर्त्यांनी सांस्कृतिक अभिव्यक्ती सादर केली. पुण्यातील रस्त्यांवर सादर केलेली दोन पथनाट्य राष्ट्र सेवा दल पुणे युवा साथींनी सादर केली. पुण्याबाहेरुन आलेल्या कार्यकर्त्यांनी विविध गीतं सादर केली. मुंबईच्या घर बचाओ घर बनाओ आंदोलनच्या पूजा पंडीत, गुजरातची राष्ट्र सेवा दलाची टीम, चिपळूणमधील कातकरी गीत सादर करणारी श्रमिक सहयोगच्या प्रयोगभूमी शाळेतील शिक्षकांची टीम, नर्मदा बचाव आंदोलनची टीम, राष्ट्र सेवा दल इचलकरंजीची टीम यांनी चळवळीतील विविध गीतं सादर केली. त्यांना साथ दिली ती राष्ट्र सेवा दलाचे जेष्ठ साथी माजी महामंत्री सदाभाऊ मगदूम आणि साथींनी. खरा तो एकची धर्म या गुरुजींच्या गीतावर राज कांबळे याने नृत्य सादर केलं तर काही तरुण कवींनी विद्रेही कविता सादर केल्या.

दुपारच्या भोजनोत्तर सत्रात एका बहारदार कार्यक्रमाचा अविस्मरणीय अनुभव हेही सांगता समारंभाचे वैशिष्ट्यच. प्रसिद्ध कलाकार अक्षय शिंपी व साथीने 'ईदगाह' या प्रेमचंद यांच्या कथेचं सादरीकरण दास्तॉंगोई या सांस्कृतिक कार्यक्रमात केले आणि उपस्थितांना एका वेगळ्याच कलानंदात नेले.

समारोप सत्र:

दोन दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमानंतर वेळ आली ती समारोप सत्राची. साने गुरुजी १२५ अभियानाच्या सांगता समारंभाचे समारोप सत्र हे निर्धार घेऊन निघण्याचे सत्र. हा नुसता समारोप कार्यक्रम नाही तर या अभियानाची पुढची वाटचाल काय असेल याची दिशा ठरविण्याचे सत्र असणार होतं. या सत्रात लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय व आर्थिक समतेचा एल्गार केला गेला. संविधानिक भारताच्या उभारणीसाठी कटीबद्धतेचा निर्धारही करण्यात आला. लोकशाही समाजवादाचा वैचारिक वारसा यापुढील काळात नव्या पिढीला सिध्द करावा लागेल अशी अपेक्षा भारत जोडो आंदोलनाचे समन्वयक योगेंद्र यादव यांनी या समारोप सत्रात व्यक्त केली. त्यावेळी विचारमंचावर जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मेधा पाटकर, सांगता समारंभाचे संयोजक प्रा. सुभाष वारे उपस्थित होते.

लोकशाही समाजवाद हा एक क्रांतिकारी विचार आहे. देशात राष्ट्रवादाच्या नावाखाली दंगा होत आहे. संस्कृती आणि सभ्यतेच्या नावाखाली गैरप्रकार होत आहेत. त्याला लोकशाही समाजवादी विचारधाराच उत्तर आहे असे योगेंद्र यादव म्हणाले. वैचारिक राजकीय जीवंतपणाचं लक्षण आपल्या विचारांची समिक्षा करणे हे आहे असे सांगून देश वाचविण्यासाठी चळवळीतील साथी, आंदोलन समूह आणि संघटना यांनी लोकशाही समाजवादाला पूनर्जीवित आणि पूनर्मजबूत करायला हवे असे स्पष्ट प्रतिपादन योगेंद्र यादव यांनी केले. लोकशाही समाजवाद ही समतावादी आंदोलनाची भारतीय परंपरा आहे. जगभरातल्या महान विचारवंतांनी आर्थिक सामाजिक समतेबरोबरच राजकीय व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही समावेश समाजवादात केला. आपल्या देशात लोकशाही समाजवादाची अगदी उलट परिस्थिती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेतील शेवटच्या भाषणात दिलेला इशारा सत्यात येतो आहे याबद्दल दु:ख व्यक्त करुन योगेंद्र यादव यांनी राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक सामाजिक विषमतेची दरी बुजविण्याची गरज कधी नव्हे ती आत्ता सर्वात जास्त आहे असे मत व्यक्त केले. आणि म्हणूनच लोकशाही समाजवादाची कल्पना पुन्हा परिभाषित करणे आवश्यक आहे असे आग्रही मत त्यांनी मांडले.

लोकशाही विचार आणि लोकशाही व्यवस्था यात जमीन अस्मानचे अंतर आहे. जोपर्यंत संसदीय लोकशाही टिकविण्यासाठी विविध संस्था सक्षम होत नाहीत तोपर्यंत लोकशाहीची हत्या करण्यासाठी लोकशाही व्यवस्थेचा उपयोग केला जाईल हा धोका हे समजून घेण्याची गरज आहे. तसेच बाबासाहेबांना लोकशाहीचे नवीन विचारवंत म्हणून पुढे आणण्याची गरज आहे असे विधानही त्यांनी केले. लोहियांनी प्रतिपादल्याप्रमाणे भारतीय संदर्भात जातीव्यवस्था व जात निर्मूलनाचा प्रश्न अजूनही मध्यवर्ती आहे याची आठवण योगेंद्र यादव यांनी उपस्थितांना करुन दिली. विविध पुरोगामी विचारधारांचा मेळ घालून लोकशाही समाजवादाची नव्याने व्याख्या करण्याचे अनिवार्य काम आपल्याला करायलाच हवे. आजच्या भांडवलशाहीला टक्कर देताना जल जंगल जमीन वाचवणे, पर्यावरणीय आंदोलने यासह सगळी आंदोलने मध्यवर्ती ठेवून ही व्याख्या करावी लागेल. आज या देशात राष्ट्रवादाच्या नावावर हल्ला होत आहे, या वैचारिक हल्ल्याचा मुकाबला करण्यासाठी

लोकशाही समाजवादाचे हत्यार वापरलं पाहिजे. संविधानिक मूल्यांवरच्या हल्ल्यासाठीही हे जरुरी आहे असेही मत योगेंद्र यादव यांनी व्यक्त केले.

योगेंद्र यादव यांच्या या महत्वपूर्ण मांडणीनंतर जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयाच्या नेत्या मेधाताई पाटकर यांनी साने गुरुजींच्या सत्याग्रहाच्या ताकदीबद्दल मांडणी करत सुरवात केली आणि आम्ही ह्या ताकदीच्या जोरावरच आंदेलनजीवीच राहणार असा स्पष्ट इशारा दिला. समता आणि न्याय हे दोन शब्द कुठेच आढळत नसतानाही 'सबका साथ सबका विकास' अशी घोषणा केली जाते. सध्याच्या परिस्थितीत साने गुरुजी असते तर त्यांनी त्याचा नक्की जाब विचारला असता असे स्पष्ट मत मेधाताईंनी व्यक्त केले.

लोकशाही समाजवादाच्या पूनर्बांधणीची गरज अधोरेखित करत ग्लोबल ते लोकल विचार करावा असे मत मेधाताईंनी व्यक्त केले. संविधानिक कर्तव्यांबद्दल बोलत असताना पर्यावरणीय कर्तव्याचा विसर पडून जल जंगल जमीन घशात घालायला निघालेल्यांचा निषेध करुन पर्यावरण वाचवायला पुढे आले पाहिजे असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. संविधानिक मूल्यांची पायमल्ली होत असताना सत्याग्रहाचा मार्ग अवलंबलाच पाहिजे. सत्य आणि अहिंसा या मूल्यांवर घाला घातला जात असताना लोकशाहीच्या चारही स्तंभांना वाळवी लागली आहे काय असा संतप्त सवालही मेधाताईंनी यावेळी केला. जनशक्तीची मोठी ताकद एकवटण्याची गरज असताना मोठ्या प्रमाणात महिला शक्तीही एकवटली जाईल असा विश्वास व्यक्त करत मेधाताईंनी लोकशाहीची विविध हत्यारं वापरण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. समांतर मिडिया, सोशल मिडिया, तथ्य शोध रिपोर्ट्स अशी विविध माध्यमे हाताळली पाहिजेत तसेच आपली रणनिती आखली पाहिजे यावरही त्यांनी भर दिला. विविध आंदोलनांना समर्थन देणे, जनअदालतांना हजेरी लावणे, नवीन शेतकी धोरणांना विरोध करणे, ग्रामसभांत भाग घेणे अशा विविध प्रकारे आपण आपली ताकद दाखवू शकतो व दबावगट तयार करु शकतो असे सांगत मेधाताईंनी नव्या आव्हानांना भिडण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

साने गुरुजी १२५ अभियानाच्या सांगता समारंभाचे संयोजक प्रा. सुभाष वारे यांनी हा सांगता समारंभ व्यवस्थित पार पडला याबद्दल समाधान व्यक्त केले. या समारंभाचे नियोजन ही सामूहिक कृती होती असे सांगून या नियोजनात भाग घेतलेल्या सर्वांनीच सामूहिक जबाबदारीने काम केल्याने कार्यक्रम यशस्वी झाला, ही सामूहिक कृतीची यशस्विता आहे यावर वारेसरांनी भर दिला. यापुढे हे अभियान अशाच सामूहिक कृतीतून पुढे नेता येईल असा विश्वासही त्यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केला. आजच्या संविधानिक मूल्यांवरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर लोकशाही समाजवादाचा वैचारिक वारसा पुढे चालवावा लागेल. त्यासाठी आपापसात प्रेमभाव जागा करावा लागेल. मिच्छामी दुक्कडम म्हणत एकमेकांशी संवाद साधायला लागेल असा आग्रहही त्यांनी व्यक्त केला. लोकशाही समाजवादाची वाहकशक्ती मजबूत करण्याची गरजही प्रा. वारे यांनी अधोरेखित केली. ही वाहकशक्ती पुरवणारी जनसंघटना मजबूत करण्याची गरज मांडताना वारे सरांनी राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून हा विचार पुढे नेण्याचे आग्रही मत व्यक्त केले आणि राष्ट्र सेवा दलाला बळ पुरविण्याचे सूचित केले. संविधानिक मूल्यांची पेरणी करण्याचे काम करणारी जनसंघटना म्हणून राष्ट्र सेवा दलाचे महत्व आहे. यापुढे राष्ट्र सेवा दलाचा दलदिनही मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचा संकल्प करण्याचेही आवाहन त्यांनी उपस्थितांना केला. कोणतेही दिर्घकालीन काम हे एका व्यक्तीचे काम नसते तर ती सामूहिक कृती असते असे सांगून वारे सरांनी या निमित्ताने लोकशाही समाजवाद, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय व आर्थिक समतेचा एल्गार करण्याचा व संविधानिक भारताच्या उभारणीसाठी कटीबद्ध होण्याचा संकल्प करण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

समारोपाच्या सत्रास उपस्थित राहू न शकलेल्या राष्ट्र सेवा दलाच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी ध्वनीफितीद्वारे संवाद साधला. ते म्हणाले, ''सामाजिक व आर्थिक न्यायासाठी लढणाऱ्यांपुढे आज मोठे आव्हान आहे. त्याचा मुकाबला करण्यासाठी, लोकशाही समाजवादाचा नवा विचार व नवी परिभाषा करावी लागेल. बेरोजगारी व इनफॉर्मल सेक्टर वाढते आहे. संसाधने व संपत्तीचे केंद्रीकरण होते आहे. पुरोगामी शक्तींसोबत राहू न इच्छिणारा नवा मध्यमवर्ग तयार होतो आहे. वंचित शोषित समुह व नव्या मध्यमवर्गियांना एकत्र जोडत लोकशाही समाजवादाचा आधार बनवावा लागेल. या दिशेने पुढे जाण्याचा आज निर्धार करुया''!

या सांगता समारोहात उपस्थित सर्वांनी जात–धर्माच्या मर्यादा ओलांडून समाजात परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना असावी, शेतकरी आणि कष्टकयांच्या घामाला न्याय मिळावा, विकास आणि सामाजिक न्याय हातात हात घालून चालावेत, या साने गुरूजींच्या विचारांना कालसुसंगतपणे पुढे घेऊन जाण्याचा संकल्प या निमित्ताने केला. लोकशाही समाजवादी विचार, कृती व संघटन मजबूत करण्याच्या दिशेनें वाटचाल करण्याचा निर्धार करण्याचा संकल्प करत साने गुरुजी १ २ ५ अभियानाची सांगता झाली. यापुढे दरवर्षी राष्ट्र सेवा दलाचा दलदिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

समारोप सत्राचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन हे अभियानाचे मुख्य समन्वयक साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे माजी सचीव राजन इंदुलकर यांनी केले. एस. एम. जोशी फाऊंडेशनचे सहसचीव उपेंद्र टण्णु यांनी आभार मानले. राष्ट्र सेवा दल पुणे जिल्हाध्यक्ष दिपाली आपटे यांनी समारोप सत्रात दिलेला संकल्प घेऊन साने गुरुजी १ २ ५ अभियानाची सांगता झाली ती पुढच्या कामासाठीच! राष्ट्रगीताने कार्यक्रम संपल्यावरही कार्यकर्ते रेंगाळत होते. एकमेकांना भेटत होते. उत्साहाने कामाच्या आखणीबद्दल भेटायचं ठरवत होते. साने गुरुजी १ २ ५ अभियानाची सांगता जरी झाली असली तरी काम चालूच राहणार आहे, संकल्पपूर्तीसाठी पुन्हा कंबर कसायची आहे या भावनेत असलेल्या साथींना जिंदाबाद करत एकेकजण निरोप घेऊ लागला.

दोन दिवसांच्या या सांगता समारंभात एक दृश्य वारंवार बघायला मिळाले. जुने नवीन साथी एकदिलाने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी झटताहेत, प्रांत भाषा लिंग धर्म जात वय पद यांच्या अडसराविना एकमेकांना साथ देत कार्यक्रम पुढे नेताहेत हे दृश्यच साने गुरुजींच्या स्वप्नातलं ! साने गुरुजी १ २ ५ अभियानाच्या निमित्ताने झाले मोकळे आकाश म्हणत अंधाराचे जाळे फेडायला निघालेल्या गुरुजींच्या धडपडणाऱ्या मुलांना उजेडाचा किरण दिसतोय तो या अशाच लहान लहान दृश्यांतून. हा सांगता समारंभ म्हणूनच नवी आशा जागवणारा!

(लेखिका राष्ट्र सेवा दलाच्या पूर्व महामंत्री असून सध्या एन ए पी एम च्या राज्य समन्वयक समितीत सक्रीय आहेत.)

siratsatpute@gmail.com

लोकशाही समाजवादाच्या नव उभारणीसाठी नऊ कलमी संकल्प!

- साने गुरुजी १ २ ५ अभियान समारोप संमेलनाच्या निमित्ताने साने गुरुजींचे, 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' हे स्वप्न सर्वदूर पसरवण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.
- आम्ही, जात – धर्म – वंश – लिंग – भाषा असा कुठलाही भेदभाव करणार नाही. सर्वांशी समानतेने व समतेने वागू.
- सर्वांची माणूस म्हणून प्रतिष्ठा राखली जाईल व सर्वांना सन्मानाने जगता येईल, अशी व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी आम्ही सतत प्रयत्न करत राहू!
- सर्व जीवसृष्टीविषयी आम्ही कृतज्ञता बाळगू आणि पर्यावरणरक्षणासाठी दक्ष राहू. निसर्गसंवादी विकास प्रक्रियेसाठी आम्ही प्रयत्न करत राहू.
- अंगमेहनत करून जगणाया सर्व नागरिकांना सन्मान मिळेल, त्यांच्या घामाचा योग्य मोबदला त्यांना मिळेल अशा व्यवस्थेसाठी आम्ही सतत आग्रही राहू. आम्ही स्वत: दैनंदिन जीवनात शक्य तितके शरीरश्रम करू आणि जास्तीत जास्त श्रमाधारित उत्पादने वापरण्याचा प्रयत्न करू.
- आम्ही समाज माध्यमांचा जबाबदारीने वापर करू. अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आग्रही राहतानाच त्याचा दुरुपयोग होणार नाही असे पाहू.
- आजच्या तरुणाईसमोर बेरोजगारीचे गंभीर आव्हान आहे याची आम्हाला जाणीव आहे. रोजगार निर्मिती वाढवणारी आर्थिक धोरणे स्वीकारण्यासाठी आम्ही शासनाशी संपर्क, संवाद आणि शांततामय संघर्ष या मार्गाने प्रयत्नशील राहू.
- न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता यावर आधारलेला 'लोकशाही समाजवादा'चा विचार आम्ही अंगिकारू.
- सर्व भारतीयांना सन्मानाने आणि समत्वाने जगण्याचा अधिकार देणाया भारतीय संविधानाची प्रामाणिक व काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू व 'संविधान विचार' समाजात रुजवण्यासाठी सत्यशोधनाचा मार्ग अंगीकारू.

साने गुरुजी: तरूणांसाठी आयडॉल

२४ डिसेंबर १८९९ हा साने गुरुजींचा जन्मदिवस. ११ जून १९५० रोजी गुरुजींनी मृत्यूस कवटाळले. गुरुजी काहींना जुन्या पिढीचे वाटतात. गुरुजींचे एकूण आयुष्य अवघे ५० वर्षे. पण कॉर्पोरेट तरूणांसाठी ते एक 'टाइम मॅनेजमेंट' चे रोल मॉडेल आहेत. त्यातील पहिली २४ वर्ष एम. ए. पर्यंतचे शिक्षण. उरलेल्या २६ वर्षा पैकी ६ वर्ष ७ वर्ष गुरुजी तुरुंगात होते. त्यांनी एकूण ६७ दिवस उपोषण केले. ८ महीने ते भूमिगत होते. म्हणजे एकूण साडेसात वर्षे होतात. म्हणजे शिक्षण व ही संघर्षाची वर्षे मिळून साडे एकतीस वर्ष झाली. उरलेल्या १८ – १९ वर्षात ६ वर्ष नोकरी व पूर्णवेळ वसतीगृह सांभाळले.

त्यातून आता उरलेल्या १३ वर्षात या माणसाने काय काय केले? महाराष्ट्रात प्रचंड प्रवास केला. स्वातंत्र्य चळवळ संघटित केली. वृत्तपत्र व मासिकांचे संपादन केले. शेतकरी कामगारांचे लढे यशस्वी केले. दलितांना विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून राज्यभर दौरा आणि आंदोलन केले. राष्ट्रीय सभेचे फैजपूर अधिवेशन यशस्वी केले. आणि ही कामे करताना व तुरुंगवासात या माणसाने १५० पुस्तके लिहीली. त्यात ११५ प्रकाशित आणि ३५ अजून अप्रकाशित...अप्रकाशित पुस्तकात एक अर्थशास्त्र विषयावर पुस्तक. त्यांनी लिहीलेल्या पानांची संख्या १५ हजारपेक्षा जास्त आहे. त्यात १४ कादंबरी, २६ चरित्र, ५८३ पानांचे पत्रवाङ्‌मय, ३९१ पानांचा कवितासंग्रह, महिलांकडून संकलित केलेल्या १००० ओव्या, ७ नाटके, १७ वैचारिक ग्रंथ, १८ वेगवेगळ्या ग्रंथांचे अनुवाद आहे. एवढे प्रचंड काम करणारा हा माणूस मॅनेजमेंट गुरु म्हणून तरूणांसाठी आयडॉल नाही का!

हेरंब कुलकर्णी
herambkulkarni1971@gmail.com

महात्मा गांधी मिशन विद्यापीठातर्फे मेधा पाटकर यांना डी. लिट. प्रदान

आदिवासी, शेतकरी, मजूर आदी कष्टकरी समाजासोबत गेल्या ४५ वर्षांपासून केलेल्या कार्याची दखल घेत मेधा पाटकर यांना महात्मा गांधी मिशन विद्यापीठातर्फे ३० नोव्हेंबर रोजी डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली. यावर्षी संशोधन, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, कला आणि इनोव्हेशन क्षेत्रातील ९००० विद्यार्थ्यांना १२८० शिष्यवृत्ती देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना विविध पदव्या देऊन अनेक प्रशिक्षित युवकांची समाजाला देणगी देत असतानांच मेधा पाटकर यांची संचालक मंडळाने निवड करून त्यांच्या वयाच्या ७० व्या वाढदिवशी त्यांना 'डॉक्टर' हे पद देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ नेते कपिल सिब्बल या कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सिब्बल यांनी तरुणांना संदेश दिला की, "तुम्ही स्वीकारलेल्या आव्हानांवरूनच तुमच्या कामाचे मूल्यमापन होईल आणि मुख्य प्रवाहाविरुद्ध चालण्याचे धाडस ज्यांच्यात असेल तेच बदल घडवून आणू शकतील''. "महात्मा गांधी यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या विद्यापीठाची ही पदवी हजारो शेतकरी, मजूर, दलित, आदिवासी आणि महिलांनी केलेल्या कार्याचा पुरस्कार आहे'', असे मेधा ताईंनी आपल्या भाषणात सांगितले. देशात असलेल्या विषमतेवर भाष्य करताना जाती–धर्माची विभागणी नाकारून प्रत्येक विद्यार्थ्याने हुकूमशाहीवादी नव्हे तर समाजवादी व्हायला हवे, असेही त्यांनी स्पष्ट केले. युवकांनी केवळ करिअरसाठी नव्हे, तर समाजातील शोषित वर्गाला समानता, न्याय, उपजीविका मिळवून देण्यासाठी आणि माणुसकीच्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी घटनात्मक, अहिंसक आणि सत्याग्रही मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.

विद्यापीठाच्या वतीने मेधा पाटकर नर्मदा चळवळीच्या ३९ वर्षांबरोबरच शहरी गरीब, मजूर आदींसाठी करण्यात येत असलेल्या कामाचे डी. लिट. प्रमाणपत्र कुलगुरू अंकुशराव कदम, कुलसचिव विलास सपकाळ, गांधीवादी नेते कमलकिशोर कदम यांच्या हस्ते देण्यात आले. औरंगाबादेतील अनेक बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक व इतरांसह विद्यापीठाचे सर्व संस्थापक व पदाधिकारी व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

साने गुरुजी १२५ अभियान

समाजवादी राजकारणासाठी राष्ट्र सेवा दलाच्या पुनर्बांधणीची गरज

योगेंद्र यादव

महाराष्ट्रातील पुरोगामी राजकारणाला आकार देण्यात राष्ट्र सेवा दलाने महत्त्वाची भूमिका बजावली. सध्या एकूणच देशात, कमी होत चाललेल्या सामाजिक कार्यक्रमांच्या आणि वाढत्या राजकीय उदासीनतेच्या संकटांना तोंड देत असताना, आपण राष्ट्र सेवा दल मॉडेलकडे आपली पावले पुन्हा टाकली पाहिजेत. भारतातील राजकारण अधीक सखोल करण्यास आणि तरुणांची बांधिलकी स्थापित करण्यात सेवा दल मदत करू शकेल.

राजकीय सभांमध्ये साधारणत: गाणी अभावानेच असतात. मात्र त्यांच्या गाण्यांनीच माझे लक्ष प्रथम वेधून घेतले. मला मराठी गाण्याचे बोल जारी नीटसे कळले नसले तरी सुरेल गायक आणि भावपूर्ण गाणे लक्ष वेधून घेत होते. गायक होता संजीव साने. कामगार संघटना चालवणारा आणि एक चतुर राजकीय रणनीतिकार. त्यानंतर ठाण्यातील वंचित तरुणांसाठी 'समता संस्कार शिविर' आयोजित करणारे अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक संजय मंगो यांच्या नेतृत्वाखाली कोरसमध्ये एक गाणे गायले जात होते. त्याच्या नावातील 'मंगो' म्हणजे 'मंगला गोपाळ'! त्याने त्याच्या नावात वडिलांच्या नावासह त्याच्या आईचे नाव समाविष्ट केले होते व जाती–पातीची निशाणी असणारे आडनाव काढून टाकले होते. निशा शिवुरकर यांनी गाणे गायले नाही पण या कार्यकर्तीने 'परित्यक्त्या' अर्थात 'नवर्याने टाकून दिलेल्या – सोडलेल्या' स्त्रियांची संघटना बांधल्याचे समजले. आणि मग विलास भोंगाडे या तरुण दलित कार्यकर्त्याचा परिचय झाला जो आपल्या कृतीतूनच बोलला.

बरोबर ३० वर्षांपूर्वी, ठाण्यात समाजवादी जनपरिषदेच्या स्थापना संमेलनात, महाराष्ट्राच्या चैतन्यशील सार्वजनिक जीवनाचा हा माझा पहिला परिचय होता. या तरुण राजकीय कार्यकर्त्यांमध्ये काहीतरी विशेष होते – आदर्शवाद, विचारधारा, ऊर्जा आणि शिस्त यांचे मिश्रण. मी अनुभवलेल्या उत्तर भारतीय सक्रियतेच्या तीव्र, मोठ्या आणि गोंधळलेल्या जगापासून हे खूप दूर होते. व्यक्तिमत्त्वात आणि वाक्प्रचारात वैविध्य असले तरी भारतातले हे सर्व कार्यकर्ते एकाच कापडातले दिसत होते. ते सर्व कोणत्या शाळेत गेले, मला आश्चर्य वाटले. तेव्हा कोणीतरी 'राष्ट्र सेवा दला'चा उल्लेख केला ज्याच्याशी ते सर्व प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित होते.

राष्ट्र सेवा दल (RSD, किंवा फक्त सेवा दल). १९४१ मध्ये अद्याप काँग्रेसमध्येच असलेल्या समाजवाद्यांनी सेवा दल स्थापन केले होते. RSD ही एक युवा स्वयंसेवी संघटना होती, जी राष्ट्रवाद, समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि विवेकवादासाठी वचनबद्ध होती. त्यावेळी राजकीय दृष्ट्या अगदी क्षुल्लक असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रत्युत्तरात जरी ते स्थापन करण्यात आले नसले तरीही फरक स्पष्ट दिसत होता. अर्थात त्यांच्यात एक बाब समान होती. RSS प्रमाणेच, सेवा दलाने दैनंदिन 'शाखा' च्या नित्यक्रमाद्वारे किशोर आणि तरुणांना संघटित करण्यावर लक्ष केंद्रित केले. सेवा दलाच्या शाखेत सांघिक मैदानी खेळ, शारीरिक प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि वैचारिक चर्चांसाठी स्थानिक किशोर व युवा मुली मुले एकत्र येत. स्वातंत्र्यानंतर, RSD काँग्रेसमधून बाहेर पडला आणि समाजवादी पक्षाची स्थापना केली. सेवा दलाने समाजवादी पक्षाला आघाडी जरी घोषित केले नाही तरी त्यांच्याशी जवळून काम केले. सेवादलाच्या पहिल्या दशकातला प्रेरणा स्त्रोत म्हणजे पांडुरंग सदाशिव साने (१८९९–१९५०) किंवा फक्त साने गुरुजी. महाराष्ट्रातील एक प्रतिष्ठित व्यक्ती. त्या संमेलनात मी पहिल्यांदा ऐकलेलं गाणं, 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' हे साने गुरुजींनी लिहिलेलं होतं. हे गाणं गायलेल्या संजीव सानेंचं नावही तेच होतं.

साने गुरुजींना सर्वसाधारण समाजवादी नेत्यासारखे मानणे कठीण आहे. एक चेहरा नसलेला रचनात्मक कार्यकर्ता, एक अतुलनीय संघटक, कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरुद्ध निर्भयपणे लढणारा कार्यकर्ता, साने गुरुजी! ते एकाच वेळी गांधीवादी,

राष्ट्रवादी, समाजवादी आणि संत होते. त्यांच्या ज्वलंत भाषणांनी तरुणांना प्रेरणा दिली आणि त्यांच्या लेखनाने – विशेषत: 'श्यामची आई' हे त्यांच्या आईबद्दलचे पुस्तक – महाराष्ट्रातील पिढ्यांच्या संवेदनांना आकार देत आहे. त्यांचे 'भारतीय संस्कृती' हे पुस्तक भारतीय संस्कृतीचे सर्व समावेशक स्वरूप दाखवून देते. सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा आणि कट्टरता नाकारून भारतीय संस्कृती अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारित आहे. ती संप्रदाय किंवा श्रद्धा, जात किंवा लिंग यांच्या आधारावर वेगळेपणा किंवा भेदभाव करण्यास नकार देते.

८२ समविचारी संघटनांसह आणि सेवा दलाचे विद्यमान अध्यक्ष नितीन वैद्य व माजी अध्यक्ष प्रा. सुभाष वारे यांच्या नेतृत्वाखाली, सेवा दलाने नुकतेच 'साने गुरुजी १२५ अभियाना'ची सांगता केली. हे अभियान म्हणजे त्यांच्या १२५ व्या जयंती निमित्त वर्षभर चाललेला उत्सव आहे. महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकारणात सेवादलाचा ठसा किती व्यापक आणि खोल आहे, हे गेल्या काही वर्षांत मला पाहायला मिळाले. सेवा दलाने अनेक संस्था निर्माण केल्या छात्रभारती, समाजवादी महिला सभा, मुस्लिम सत्यशोधक समाज, समाजवादी अध्यापक सभा, आंतरभारती याशिवाय भारतीय भाषांमधील बंध निर्माण करण्यासाठी आणि विधायक कार्यासाठी सेवा पथक. एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन, नानासाहेब अकादमी आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट या सारख्या संस्था हा वारसा विविध अंगाने जिवंत ठेवण्याचे काम करत आहेत.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील सर्व क्षेत्रातील अनेक जाणते नेते सेवा दलाशी संबंधित आहेत. यामध्ये एस एम जोशी, मृणाल गोरे, मधु दंडवते आणि बापू काळदाते यांसारखे राजकीय नेते, सुधा वर्दे, प्रमिला दंडवते, नरेंद्र दाभोलकर, हमीद दलवाई, बाबा आढाव आणि मेधा पाटकर यांसारखे सामाजिक कार्यकर्ते, श्रीराम लागू, निळू फुले आणि स्मिता पाटील यांसारख्या नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश आहे. आचार्य जावडेकर, गणेश देवी यांच्यासारखे विचारवंत. याशिवाय सेवा दलाशी संबंधित हजारो कार्यकर्ते, व्यावसायिक, लेखक, शिक्षक, पत्रकार विविध संस्था, चळवळी आणि नियतकालिके यांच्या अनुपस्थितीत महाराष्ट्राचे सार्वजनिक जीवन आकारासच आले नसते. आरएसएस–भाजपच्या अथक हल्ल्याला तोंड देत संविधानिक मूल्ये आणि लोकशाही संस्थांचे रक्षण करण्यासाठी ते एक बळकट माध्यम आहेत.

पहिल्या दोन दशकांत ज्या प्रकारची ताकद आणि स्थान मिळवले होते, ते आज सेवा दलाकडे नाही. तरीही ते आपल्या घटनात्मक प्रजासत्ताकावर पुन्हा हक्क सांगण्यासाठी आवश्यक असलेल्या सखोल राजकारणाचे मॉडेल देते. एक गोष्ट स्पष्ट आहे: प्रजासत्ताकाचे सध्याचे विघटन केवळ भाजपला निवडणूक विरोध करून थांबवता येणार नाही. आपल्याला सखोल राजकारणाची गरज आहे ज्यामध्ये नागरिकांचे राजकीय शिक्षण, तरुण पिढीमध्ये संवैधानिक मूल्ये जोपासणे, समस्या आणि त्यावरील उपाय यांची सर्जनशील रचना, राजकीय कार्यकर्ते आणि नेत्यांना तयार करणे आणि भारत नावाच्या या काल्पनिक समुदायाची पुनर्रचना करणे समाविष्ट आहे. हे काम राष्ट्र सेवा दलाने केले. आज आपल्यात याचाच तीव्र अभाव आहे.

सेवादल मॉडेलचे धडे समजून घेणे अवघड नाही. प्रथम, आपण केवळ तरुणांनाच नव्हे तर शाळेत जाणाऱ्या किशोरवयीनांनाही लक्ष्य केले पाहिजे. दुसरे, संकुचित अर्थाने राजकारण न करता खेळ आणि संस्कृतीच्या माध्यमातून चारित्र्य घडवण्याच्या उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. तिसरे, संवैधानिक मूल्ये आणि समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताकाचे आदर्श जोपासण्याचा कोणताही प्रयत्न सकारात्मक राष्ट्रवाद, एक मजबूत प्रादेशिक संस्कृती आणि सांस्कृतिक आचारसंहितेमध्ये जोडला गेला पाहिजे. चौथा, अन्यायाविरुद्धच्या संघर्षाला निर्माण अर्थात रचनात्मक कृतीची जोड दिली पाहिजे. आणि पाचवे, निवडणुकीच्या राजकारणाच्या आणि राज्याच्या सत्तेच्या आखाड्यात हस्तक्षेप करताना, हे सखोल राजकारण कोणत्याही राजकीय पक्षापासून अंतर राखून केले तरच चांगले होईल.

निश्चितच, सेवा दल हे या प्रकारचे एकमेव मॉडेल नाही. आम्ही देशभरात असे उपक्रम राबवले आहेत: द्रविड कळघम, केरळ साहित्य शास्त्र परिषद, कर्नाटक राज्य रैयथा संघ, कर्नाटकातील दलित संघर्ष समिती, ऑल आसाम स्टुडंट्स युनियन, छत्तीसगड मुक्ती मोर्चा, छात्र युवा संघर्ष वाहिनी, इंडियन

(पान २९ वर)

फक्त १२५ नव्हे तर एक १०२५ वर्षांनंतरही साने गुरुजींची आठवण राहील

विलास किरोते

२१ फेब्रुवारी १९५० रोजी राष्ट्रसेवा दलाच्या कार्यकारिणीच्या बैठकीला संबोधित करतांना साने गुरुजी म्हणाले होते, ''सेवा दलातले तुम्ही सैनिक माझे स्वप्न पूर्ण कराल असं मला वाटतं. मला विधायक शब्द आवडतो, ज्यात निर्मितीचा आनंद मिळतो'', ते विधायक काम असे त्यांचे म्हणणे होते. तूम्ही मुलांना होडी करायला शिकवलं का कधी? शिकवून पहा. होडी करता आली की मुले नाचायला लागतात. ही आणि अशी अनेक उदाहरणं देऊन गुरुजी विचार आणि विधायक कामांची जोड देण्याची आज गरज आहे, असे पटवून देत. केवळ राजकीय सत्ताकारण व शाब्दिक समाज परिवर्तन किंवा हृदय परिवर्तनाची वाट पहात बसलो तर फार काही लवकर होईल अशी अपेक्षा नाही. ज्ञान आणि श्रम यांना एकत्र आणले पाहिजे, असेही गुरुजींनी म्हटले आहे. आपण प्रत्येकाने हाताने काम करायला शिकले पाहिजे, असे गुरुजी म्हणतात. याच भाषणात गुरुजींनी श्रम पथकाची कल्पना मांडली. तसेच आपल्याला शेतीची पुनर्रचना करायला हवी हे सांगताना गुरुजी म्हणाले, ''जमिनीची धूप थांबवली पाहिजे, शेतांना ताली घातल्या पाहिजेत, धान्यासाठी आपल्याला कोणाच्या तोंडाकडे पहायला लागणार नाही''. हे सारं करण्यासाठी 'भूसेना' उभारावी लागेल असे त्यांचे म्हणणे होते. वरील गोष्टी आपण लोकांना शिकवल्या पाहिजेत. साने गुरुजी चाकोरी बाहेर जाणारे होते. त्यांना पक्षाच्या बंधनात अडकवणे, राजकारणाच्या ठराविक वळणाने जायला लावणे शक्य नव्हते. असे जगावेगळे होते ते आमचे साने गुरुजी.

समुद्रावर शांतपणे जाऊन बसणे हा साने गुरुजींचा आवडता छंद होता. ते नारायण सामंत यांच्या आश्रम शाळेत आले की आदिवासी मुलांना गोष्टी सांगत व त्यात कमालीचे रंगून जात. मुलं गोष्टी ऐकताना खूप हसत व गुरुजीही त्यांच्यासोबत हसत. त्यांचं ते निरागस हास्य खूप पाहण्यासारखे असायचे. साने गुरुजी कटू सत्याला सामोरे जाण्याऐवजी ते कटूतेला टाळू पहात, भाषांतर करताना देखील ते काही भाग वगळत त्यांनी Mayor of Casterbridge चं भाषांतर केलंय. पण मूळ कादंबरी वाचली असेल तर लक्षात येतं की This is not Hardy's Novel. यात रूपांतरात हार्डी पेक्षा गुरुजीच अधिक जाणवतात. यातून गुरुजींचा हळवेपणा, मातृ हृदयी व संवेदनशीलता ठाई ठाई जाणवते. परंतु ते केव्हा केव्हा वज्राहूनही कठोर झालेले आपल्याला दिसतात. हिंदुस्थानात स्वार्थाचा प्रचंड बुजबुजाट झालेला आपण पाहतोच आहोत. साने गुरुजींच्या स्वभावाला हे झेपणार नव्हतं. तेव्हा विनोबांची गीता प्रवचनं त्यांच्या मनाला आधार देत. तर केव्हा गांधीजींच्या सत्याग्रहाचा त्यांच्या मनाला आधार वाटे.

मोरारजीभाई देसाई महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना सेवा दलात शिक्षकांनी जाऊ नये असे सरकारी परिपत्रक काढले गेले. त्याला विरोध म्हणून साने गुरुजींनी बेमुदत उपोषणाचा निर्णय जाहीर केला. पण तेवढ्यांनी सरकारने पूर्ण पत्रक मागे न घेता फक्त त्यात दुरुस्ती केली पण याने साने गुरुजींचे उपोषण टळले होते. एकदा २६ जानेवारीला साने गुरुजींच्या मार्गदर्शनाप्रमाणे महाराष्ट्रात सहभोजन व सहक्रीडा असा कार्यक्रम झाला होता. एकमेकांनी आणलेले जेवण सर्वांनी वाटून खाल्ले, हिंदू– मुस्लिम, दलित यांचा यात सहभाग होता.

गुरुजींनी रचलेले गीत म्हणजे – ''किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया, नाही आता राहणार आम्ही दीनवाणी गाया, कडेवरी मुले घेऊ क्रांतीमध्ये सामील होऊ.'' या गीताची आठवण व प्रत्यक्ष कृतीचे नियोजन करण्याची आज वेळ आली आहे. १९४२ च्या आंदोलनाच्या वेळी ८ ऑगस्ट ला मुंबईमध्ये काँग्रेसचे जे अधिवेशन भरले त्या अधिवेशनासाठी पुण्यातून एस. एम. जोशी आपल्या पत्नीसह गेले होते. ८ ऑगस्टला चलेजाव चा ठराव पास झाल्यानंतर पुढाऱ्यांची धरपकड होणार हे लक्षात आल्यानंतर एस एम जोशींनी त्यांच्या पत्नीला पुण्याला पाठवून दिले व स्वत: भूमिगत झाले. ते ताडदेवला जनुभाऊ गुणे यांच्या निवासस्थानी गेले. गुणे हे नगरच्या वैद्यराज गुण्यांचे चिरंजीव. ही जागा नगरच्या जनुभाऊ पटवर्धनांनी भूमिगत नेत्यांना

राहण्यासाठी निश्चित केली होती. दोन मजल्यांची ती जागा भूमिगतांचे निवासस्थान बनली. त्या जागेत एकच अडचण होती ती म्हणजे तेथे उंदीर फार होते. आपण भूमिगत आणि आपले येथील सोबती बिळात राहणारे उंदीर म्हणून भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये ती जागा 'मूषक महाल' म्हणून ओळखली जाऊ लागली. ११ ऑगस्ट १९४२ ला साने गुरुजी गुप्तपणे मुंबईला आले आणि तेही एस. एम. राहत असलेल्या या मूषक महालात दाखल झाले. साने गुरुजी मातृहृदयी, उदार मनाचे म्हणून आपण ओळखतो, परंतु चले जांव आंदोलनात त्यांचा फार मोठा सहभाग होता हे यावरून दिसून येते. याच काळात साने गुरुजी गुप्तपणे कार्यकर्त्यांच्या बैठकांत जात आणि परत आल्यावर गुप्त पत्रकांचा स्फूर्तीदायक मजकूर लिहित. कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनासाठी 'क्रांतीच्या मार्गावर' ही ओजस्वी पुस्तिका साने गुरुजींनी मूषक महालातच लिहिली.

१८ एप्रिल १९४३ ला मुंबई पोलिसांनी मूषक महालावर छापा घालून शिरुभाऊ लिमये, नानासाहेब गोरे, साने गुरुजी व माधव लिमये यांना पकडले. पुण्यात कॅपिटल बॉम्ब खटला प्रथम सुरू झाला. सरकारने महाराष्ट्र कटाचा खटला भरण्याचे ठरवले. या खटल्यात शिरूभाउ लिमये, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, साने गुरुजी आदींना आरोपी करण्यात आले. परंतु पुरेशा पुराव्या अभावी हा खटला उभाच राहिला नाही. नाशिक तुरुंगात असतांना गोकुळाष्टमीला साने गुरुजींनी राजबंद्या समोर कीर्तन केले. त्या दिवशी एस. एम. जोशी यांनी आपल्या दैनंदिनीत लिहिले आहे 'आज गोकुळाष्टमीचा दिवस, अनेकांनी उपवास केला, मी मात्र केला नाही. तरीपण माझे मन प्रसन्न आहे. या दिवशी साने गुरुजींचे कीर्तन फार सुंदर झाले. गुरुजींना गाता येत नाही पण किर्तनात काय तन्मयता, जणू गंगेचा प्रवाह चालला आहे. माझ्या भावना आज अगदी उचंबळून आल्या. मी अत्यंत भाविकपणे साने गुरुजींच्या पायावर डोके ठेवले. माझ्या डोळ्यात अश्रू आले. शेवटी आरतीच्या भजनाला तर तल्लीनतेने मी नाचलो देखील'. असे कीर्तन करणारे साने गुरुजी आणि त्यांच्या कीर्तनाला नाचणारी एस.एम. जोशी अशा प्रकारची समाजवादी कार्यकर्ते आपल्या स्वातंत्र्य आंदोलनाला आणि समाजवादी चळवळीला मिळाले हे समाजवादी चळवळीतील कार्यकर्त्यांनी समजून घेण्याची अत्यंत गरज आहे. या कीर्तनानंतर बराकीत परत येतांना नानासाहेब गोरेही म्हणाले की, "साने गुरुजींच्या कीर्तनामध्ये आणि वक्तृत्वामध्ये शुचीतेकडे नेण्याची विलक्षण शक्ती आहे, आमचे साने गुरुजी म्हणजे निर्मळ प्रेमाचा समुद्रच".

३० जानेवारी १९४८ ला महात्मा गांधींवर गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण देशभर प्रचंड संताप उसळला. साने गुरुजींनी यावेळी २१ दिवस उपोषण केले. तेव्हा एस. एम. असे म्हणाले, "साने गुरुजींच्या भावनेची तीव्रता आणि त्यांनी आत्मशुद्धीसाठी केलेले उपोषण यामुळे मी अंतर्मुख झालो. साने गुरुजींच्या उपोषणातून सर्व कार्यकर्त्यांच्या भावना व्यक्त झाल्या. त्यांनी आत्मक्लेषाचा जो मार्ग स्वीकारला त्यामुळे माझ्या मनातील किल्मीष वाहून गेले. आमच्या मनाला शुचीतेचा पवित्र स्पर्श झाला". साने गुरुजी १२५ च्या निमित्ताने वेगवेगळे कार्यक्रम घेणे, व्याख्याने देणे, सेमिनार घेणे, परिषदा घेणे इत्यादी कार्यक्रम होत राहतील, घेता येतील. परंतु साने गुरुजींनी दिलेला खरा आंतरभारतीचा उपक्रम, प्रत्यक्ष विधायक कामाचा उपक्रम, भूमी सेना निर्माण करण्याचे केलेले आवाहन, या गोष्टीकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही. साने गुरुजींनी सुरू केलेली 'साधना'च केवळ चांगल्या पद्धतीने आता चालतांना दिसते आहे. परंतु साने गुरुजींनी केलेली ही आवाहने व उपक्रम यांच्या मार्गावर चालण्याची आज खरी गरज आहे. म्हणून पुन्हा एकदा कृती कार्यक्रम करण्यासाठी सर्व समाजवादी कार्यकर्त्यांनी एकत्र यावं, हीच साने गुरुजींना खरी आदरांजली ठरेल.

गुरुजी कवी, लेखक, कलाकार, किर्तनकार, साहित्यिक, संपादक, पत्रकार, समाजसेवक, क्रांतीकारक, शिक्षक, व्यवस्थापक, कामगार नेता, संघटक, राजनितीज्ञ, समाजशास्त्रज्ञ होते. गुरुजींनी गुरुजी, शिक्षक या संज्ञेत अर्थ भरला. गुरुजी भारतीय जनतेसाठी लढले, झिजले, विद्यार्थ्यांचे आई बाप झाले, दलितांचे मित्र झाले, अनेक आईचे मुलगे झाले. गुरुजीनी नीतीशास्त्र फक्त शिकवले नाही तर जगून दाखविले. म्हणूनच गुरुजी फक्त गुरुजी राहीले नाही तर ते कुलगुरू, शिक्षणतज्ञ, आचार्य झाले. म्हणूनच या गुरुजीची केवळ १२५ जयंती नव्हे तर १०२५ जयंतीही साजरी होईल. गरज आहे त्या जयंतीत अर्थ भरण्याची आणि

(पान २९ वर)

साने गुरुजी १२५ अभियान

एकात्मतेचे सांस्कृतिक राजकारण!

सिरत सातपुते

साने गुरुजी १२५ अभियाना अंतर्गत, मागील महिन्यात गुजरात, बिहार, केरळ या राज्यात कार्यक्रम झाले. त्या पैकी केरळ मधील यात्रेचा हा संक्षिप्त रिपोर्ताज.

साने गुरुजी शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त गेले वर्षभर साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाच्या पुढाकाराने साने गुरुजी १२५ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गतच केरळमध्ये २ ते ६ डिसेंबर २०२४ दरम्यान राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष जॉर्ज जेकब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि केरळचे माजी कार्याध्यक्ष विजयराघवन चेलिया यांच्या पुढाकाराने 'राष्ट्रीय सांस्कृतिक आदान–प्रदान २०२४ अभियान' आयोजित करण्यात आले होते. २ डिसेंबर २०२४ रोजी वायनाड येथील मनन्थवाडी तालुक्यातील कोईलेरे या आदिवासी खेडेगावातील गोत्र दिपम लायब्ररी या सांस्कृतिक केंद्रात या सांस्कृतिक अभियानाचे उद्घाटन स्मारकाचे माजी अध्यक्ष डॉ. संजय मंगला गोपाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

केरळ पूराच्यावेळी राष्ट्र सेवा दलाने केलेल्या मदतीने गोत्र दिपम लायब्ररीत बांधलेल्या सभागृहात अभियानाचे उद्घाटन झाले. "धर्म हो एकही सच्चा, जगतको प्यार देवें हम" या हिंदी प्रार्थनेने महाराष्ट्रातील राष्ट्र सेवा दलाच्या बाबासाहेब नदाफ आणि साथींच्या कलापथकाने कार्यक्रमाची सुरुवात केली. केरळ मधील सदर अभियानाचे मुख्य संयोजक विजयराघवन चेलिया यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या सांस्कृतिक अभियानाचे नेतृत्व करणारे जनआंदोलनांचे राष्ट्रीय समन्वयक संजय मंगला गोपाळ यांनी देशभरात सुरू असलेल्या साने गुरुजी १२५ अभियानाची माहिती दिली. देशभरात अनेक धर्म आचरणात आणले जात असताना आजच्या द्वेषमूलक परिस्थितीत साने गुरुजींचा 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' हाच विचार तारेल असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. आणि म्हणूनच देशभरातील संस्था संघटनांच्या सहकार्याने साने गुरुजी १२५ अभियानाच्या वतीने देशभरात विविध यात्रा काढण्यात येत आहेत अशी माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली.

महाराष्ट्रातील कलापथकाची टीम आणि केरळमधील आदिवासींची सांस्कृतिक टीम यांनी एकत्रितपणे सांस्कृतिक अभियानात भाग घेणे हे साने गुरुजींच्या आंतरभारती संकल्पनेचे मूर्त रुप आहे अशा शब्दांत स्मारकाच्या विश्वस्त सिरत सातपुते यांनी या अभियानाचे महत्व अधोरेखित केले. स्मारकाच्या कोषाध्यक्ष माधुरी पाटील यांनी साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाची माहिती देवून उपस्थितांना स्मारकात येण्याचे आमंत्रण दिले. महाराष्ट्रातील राष्ट्र सेवा दलाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते बाबा नदाफ यांनी तमिळ भाषेतील शेतकरी नृत्य सादर केले. यावेळी वायनाड मधील पारंपरिक आदिवासी गीतांवर वेगवेगळ्या नृत्याचे सादरीकरण गोत्र दिपम लायब्ररीच्या सदस्यांनी केले.

साने गुरुजी १२५ अभियानाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकाची टीम, राष्ट्र सेवा दल महाराष्ट्रचे कलापथक, केरळमधील गोत्र दिपम लायब्ररी, वायनाडचे आदिवासी सांस्कृतिक पथक आणि संविधानाच्या सन्मानाचे रक्षण करण्याचा संदेश घेऊन निघालेले वायनाडचे सांस्कृतिक कार्यकर्ते या दौऱ्यात सहभागी झाले होते. ३ डिसेंबरला (दुसऱ्या दिवशी) कोझीकोडेच्या दिशेने "खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे" या घोषणेने प्रवास सुरू झाला आणि धुवांधार पावसात तीनएक तासांचा प्रवास मल्याळी गाण्यांच्या तालावर सुरू राहिला. वायनाडमधील आदिवासी पथक आणि महाराष्ट्रातले राष्ट्र सेवा दलाचे कलापथक यांचा हा एकत्रित प्रवास आंतरभारतीच्या अंगाने एकमेकांना जोडणारा सांस्कृतिक प्रवास. चार दिवस एकत्र घालवल्यावर भाषा अडसर न येता एकमेकांशी झालेली मैत्री आणि सहभावाची देवाणघेवाण ही या सांस्कृतिक अभियानातील महत्वाची उपलब्धी.

वायनाड जिल्ह्यातून निघालेल्या या यात्रेचे स्वागत कोझीकोड जिल्ह्यातील कन्ननकरा चेलान्नूर येथील श्री नारायण

विलासम अप्पर प्रायमरी स्कूल येथे करण्यात आले. कन्ननकरा येथील ज्ञानोदयम वाचन कक्ष आणि ग्रंथालय तसेच श्री नारायण विलासम शाळेने या यात्रेच्या निमित्ताने 'राष्ट्रीय एकात्मता सांस्कृतिक आणि कला संगम' चे आयोजन केले होते. विजयराघवन चेलिया यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन चेलान्नूर ग्रामपंचायत अध्यक्ष पी.पी.नौशीर यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या संचालक जोत्स्ना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ. संजय मंगला गोपाळ, सिरत सातपुते, माधुरी पाटील, विजयराघवन चेलिया यांनी विद्यार्थी व गावकऱ्यांशी संवाद साधला. महाराष्ट्रातील कलापथकाने तसेच वायनाडमधील गोत्र दिपममधील सांस्कृतिक पथकाने आदिवासी कलांसह विविध कला कार्यक्रम सादर केले. साने गुरुजींचे विचार या निमित्ताने केरळातील या गावात पोहोचत आहेत आणि या विचारांचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत नक्की उपयोग होईल असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

संध्याकाळी कोझीकोड जिल्ह्यातील तिक्कोडी गावात साने गुरुजी १२५ अभियाना निमित्त समता उत्सव आयोजित करुन या यात्रेचे स्वागत करण्यात आले. तिक्कोडी गावातील आणि त्रिकुटूर विभागातील समाजवादी विचारधारेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या उत्सवात सामिल झाले होते. डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी आजच्या परिस्थितीत साने गुरुजींच्या विचारांचे महत्व आणि समाजवादी विचारधारेच्या सर्व घटकांनी एकत्र येण्याची गरज अधोरेखीत केली. कार्यकर्त्यांच्या उपस्थितीतील या कार्यक्रमात देशातील सद्यस्थिती, साने गुरुजींच्या विचारांची आजच्या काळातील प्रासंगिकता या विषयावर उपस्थितांनी विचार मांडले. एम.के. प्रेमन अध्यक्षस्थानी होते. सांस्कृतिक पथकाने सादर केलेला आदिवासी कलाविष्कार आणि राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकाने सादर केलेली राष्ट्रीय एकात्मतेची गाणी व नृत्य यांनी या समता उत्सवात बहार आणली.

४ डिसेंबरच्या सकाळी या अभियानातील सांस्कृतिक टीमने जवळच्या समुद्रकिनारी मराठी आणि मल्याळी संस्कृतीचे आदान प्रदान केले आणि मैत्रीची पाळेमुळे घट्ट झाली. त्याचवेळी विजयराघवन चेलिया, डॉ. संजय मंगला गोपाळ आणि सिरत सातपुते हे तिघेजण कोझीकोडच्या काही साथींसोबत एका धरणे आंदोलनात सामिल झाले. बेकायदा उत्खननाविरुध्द गेले सात महिने आंदोलन करणाऱ्या मल्लापूरम जिल्ह्यातील एरामन्गलम गावातील ग्रामस्थांनी कोझीकोड जिल्हा कलेक्टर ऑफिससमोर एक दिवसाचे धरणे आंदोलन केले होते. जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाचे (NAPM) राष्ट्रीय संयोजक डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी 'विनाश नको विकास हवा' ही घोषणा देत एरामन्गलम ग्रामस्थांच्या या लढ्यात NAPM सोबत आहे अशी ग्वाही दिली. ग्रामस्थांच्या जनजीवनावर, उपजिविकेवर आणि पर्यावरणावर होत असलेल्या या बेकायदेशीर आक्रमणावर हल्लाबोल करत त्यांनी हे बेकायदेशीर उत्खनन तात्काळ थांबवण्याची मागणी केली. साने गुरुजी १२५ अभियानाच्या निमित्ताने सुरू असलेले केरळमधील सांस्कृतिक अभियान समता सेनानी आंदोलनकारी साने गुरुजींच्या निमित्ताने सामान्य नागरिकांच्या आंदोलनाशी अशा प्रकारे जोडले गेले.

साने गुरुजींच्या १२५ व्या जयंती निमित्त आणि भारतीय संविधानात अंतर्भूत असलेल्या मूल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने देशव्यापी सांस्कृतिक देवाणघेवाण करण्याच्या उद्देशाने निघालेल्या यात्रेचे स्वागत दुपारी कोझीकोड जिल्ह्यातील मेप्पायुर या एका छोट्याशा शहरातील शाळेत करण्यात आले. १०६ दिवसांचा गांधी वाचन उपक्रम करणाऱ्या G.V.H.S.S या शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरुन आणलेल्या पारंपारिक जेवणाच्या अंगत पंगतीने सांस्कृतिक देवाणघेवाण सुरू झाली. साने गुरुजींचा आंतरभारतीचा विचार इतका सहजपणे स्विकारलेल्या या विद्यार्थी, पालक व शिक्षकांना मनापासून सलाम!

कार्यक्रमाचे उद्घाटन मेप्पायुर ग्रामपंचायतीचे अध्यक्ष के. टी. राजन यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून ख्यातनाम लोकगीत गायक मजीश करयत उपस्थित होते. भारतीय राज्यघटनेचे सार असलेल्या भारतियत्वाची ओळख ही फक्त भारतातील माणसे नव्हे तर इथले सजीव व निसर्गही आहे याची प्रमुख पाहुणे डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी उपस्थितांना आठवण करुन दिली.

शाळेच्या पटांगणात झालेल्या सादरीकरणात यात्रेतील पथकाबरोबरच शाळेतील विद्यार्थी व शिक्षकही सामिल झाले होते. मराठी आणि हिंदी भाषेतील देशभक्तीपर गाण्यांसह वट्टकली, कोळक्कली आणि कंबलनाट्टी या पारंपरिक आदिवासी कलांचे सादरीकरण करण्यात आले. वैचारिक मूल्याधारित शिक्षणाचा

परिपाठ घालून दिलेल्या या शाळेतील हा सांस्कृतिक उल्हास या अभियानातील सर्वांचाच उत्साह वाढविणारा!

संध्याकाळी चेमनचेरी गावातील शंभर वर्ष जुन्या कोलक्कड अप्पर प्रायमरी स्कूलमध्ये गांधीजींच्या विचारांना समाजवादाशी जोडणाऱ्या लोहियावादी साथींनी लोहिया मंदिर या संस्थेतर्फे स्वागत आयोजित केले होते. चेमनचेरी कोलक्कड लोहिया मंदिर समतोत्सवमने आयोजित केलेल्या या स्वागत समारंभासाठी साने गुरुजी १२५ अभियानानिमित्त गावातील खूप मोठा जनसमुदाय इथे जमला होता. कथकली नृत्याचे माहेरघर असलेले चेमनचेरी हे गाव हे पूर्वीचा समाजवाद्यांचा बालेकिल्ला. ऑगस्ट क्रांतीच्या आठवणींनी धगधगत असलेल्या चेमनचेरीच्या मातीवर समाजवाद्यांच्या त्याग आणि सर्जनशील कार्याचा ठसा उमटला आहे. केरळमधील राष्ट्र सेवा दलाचे पहिले शिबिर हे चेमनचेरी येथेच झाले होते.

संपूर्ण केरळमध्ये राष्ट्र सेवा दलाची शिबिरे आयोजित केली गेल्यास युवापिढीबरोबर सांस्कृतिक आदान प्रदानाबरोबरच वैचारिक आदानप्रदानही होईल असा विश्वास कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ समाजवादी के. पी. उन्नी गोपालन मास्टर यांनी व्यक्त केला. जी. एस. अविनाश, मोहन, विजयराघवन चेलिया यांची भाषणे झाली. या यात्रेचे नेतृत्व करणारे डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी समाजवादी चळवळीचे वैभवशाली दिवस परत आणण्याचे आवाहन केले. साने गुरुजी १२५ अभियानानिमित्त सुरू असलेल्या या यात्रेचे हे उद्दीष्ट सांगून त्यांनी या निमित्त समाजवादी विचारधारा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचा संकल्प करण्याचेही आवाहन केले. यात्रेतील सांस्कृतिक पथकाबरोबरच चेमनचेरीतील कथकली नृत्य कलाकारांनी आपली कला सादर केली. वायनाडच्या गोत्र दिपम लायब्ररीचे सांस्कृतिक पथक हे चेमनचेरीच्या कार्यक्रमानंतर आपल्या गावी परत गेले.

चेमनचेरीतील मुक्कामानंतर कासारगोड जिल्ह्यात या सांस्कृतिक अभियानाचा समारोप होणार होता. महाराष्ट्रातील पथक तत्पूर्वी चेमनचेरीजवळच्या कप्पाडचा किनाऱ्यावर पोहोचले. हाच तो ऐतिहासिक किनारा जिथे भारतभूमीवर वास्को द गामाने आपले पहिले पाऊल ठेवले! पाश्च्यात्य जगाला आपल्या देशात येण्याचा समुद्रमार्ग समजला आणि इथल्या व्यापारी आक्रमणाची पायाभरणी झाली. अतिशय सुंदर अशा या किनाऱ्यावर महाराष्ट्राचे पथक थोडा वेळ विसावले. हा अथांग महासागर जगाला प्रेम अर्पावे हा साने गुरुजींचा संदेश घेऊन निघालेल्या महाराष्ट्रातील पथकाला कवेत घेत जणू शांतवत होता. गेले चार दिवस अखंड श्रमलेल्या साने गुरुजींच्या या धडपडणाऱ्या मुलांना हा विसावा पुढील प्रवासासाठी नक्कीच ताजातवाना करणारा!

मजलदरमजल करत तीन साडेतीन तासांचा रेल्वे प्रवास करुन कासारगोड जिल्ह्यातील त्रिकारीपूरला पोहोचल्यावर कासारगोड जिल्ह्यातील अनेक जेष्ठ समाजवादी साथी स्वागताला हजर होते. मोहम्मद अब्दुर रहमान मेमोरियल लायब्ररी आणि वाचन कक्ष तसेच लोहिया विचारवेदी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्र सेवादल सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन राजदचे राज्य सचिव टी. व्ही. बालकृष्णन यांनी केले. ग्रंथालयाचे अध्यक्ष पी. राजेश अध्यक्षस्थानी होते. वायनाडपासून सुरू झालेल्या या सांस्कृतिक अभियानाचा समारोप इथे झाला. भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण होत असताना राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याने आकार दिलेल्या घटनात्मक मूल्यांसमोर गंभीर आव्हाने आहेत आणि याला तोंड देण्यासाठी जातीयवाद आणि सांप्रदायिकतेच्या विरोधात एकात्मतेचे सांस्कृतिक राजकारण उदयास आले पाहिजे असे आग्रही मत या अभियानाचे नेते डॉ. संजय मंगला गोपाळ यांनी समारोप प्रसंगी मांडले. राष्ट्र सेवा दल कलापथकातले कलाकार आणि कासारगोड जिल्ह्यातील अन्नूर श्रीरत्नम तिरुवाथिरा ग्रुपने विविध कलात्मक सादरीकरण केले.

विकासाच्या नावावर ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीवर मात करत मार्गक्रमण करणारे कबानी नदीच्या किनाऱ्यावरील वायनाडच्या जंगलातील आदिवासी, राष्ट्र सेवा दलाच्या प्रयत्नाने गोत्र दिपम लायब्ररीच्या माध्यमातून उभारी घेत आहेत. काळ्याकुट्ट अंधाराला भेदत प्रकाशकिरणं पसरवत सांस्कृतिक अंगाने विचारांचे आदानप्रदान करत आहेत आणि महाराष्ट्रातील राष्ट्र सेवा दलाचे कलापथक साने गुरुजींच्या विचारांचा वसा घेऊन त्यांच्यासोबत एकत्रित कार्यक्रम करत आहेत. हे सर्व दृश्यच अविस्मरणीय! जणू साने गुरुजींना १२५व्या जयंतीनिमित्ताने मनोमन आदरांजली वाहून एकात्मतेचे सांस्कृतिक राजकारण उदयाला आणणारं!

satputesirat@gmail.com
8149673929

टिप्पणी

कायदेशीर, शांततामय व लोकशाही पद्धतीनें काम करत राहू!

भारत जोडो अभियान

मागील महिन्यात नागपूर येथे पार पडलेल्या नव्या महाराष्ट्र सरकारच्या पहिल्याच विधानसभा अधिवेशनात मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी सामाजिक सुरक्षा बिल आणतांना केलेल्या भाषणात भारत जोडो अभियानाबाबत कोणतेही ठोस पुरावे न देता आरोप केले. त्या बाबत भारत जोडो अभियानच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी दिलेली प्रतिक्रीया.

भारत जोडो अभियान, ही संविधानिक मूल्ये आणि लोकशाही संस्थांचे रक्षण करणारी आणि प्रोत्साहन देणारी नागरिकांची चळवळ आहे.

महाराष्ट्रातील नव्या निवडून आलेल्या सरकारने सत्तेत येताच केलेले पहिले काम पाहून आम्ही व्यथित झालो आहोत. ते म्हणजे, महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा अधिनियम २०२४ नावाचे विधेयक मांडणे, हे संविधानिक मूल्यांना धरून नाही , हा लोकशाही संस्थांना दुबळे करण्याचा प्रयत्न आहे,

१८ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधिमंडळात माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केलेले विधान, या विधेयकाचा वापर राजकीय विरोधक आणि भाजपच्या विचारसरणीच्या विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी केला जाईल, असे संकेत देणारे आहे. हे विधान पाहून दु:ख होते की नव्या सरकारने महाराष्ट्रातील जनतेच्या आयुष्य आणि उपजीविकेच्या महत्त्वाच्या समस्यांवर काम करण्याऐवजी सूड उगवण्याला प्राधान्य दिले आहे.

भारत जोडो अभियान, संविधानप्रेमी संस्था आणि नागरिकांसोबत, सत्ताधारी पक्षाविरोधातील प्रत्येक विरोधाला शहरी नक्षलवादी आणि देशद्रोही असे नाव देणे आणि अशा विरोधकांना गप्प करण्यासाठी कठोर कायदे आणणे, हे संविधानाच्या कलम १९ चे उल्लंघन करणारे आहे,

“असे विशेष कायदे‘‘ तयार करून या भूमीतील कायद्यातील प्रक्रियात्मक सुरक्षिततेला बायपास करणे ही प्रवृत्ती गंभीर आहे. अशा कायद्यांचा मुख्य उपयोग म्हणजे गैरवापर. महाराष्ट्रातील नव्या निवडून आलेल्या सरकारला आम्ही आठवण करून देऊ इच्छितो की, तुम्ही संविधानामुळे सत्तेत आहात आणि तुम्ही त्याच्या गाभ्यातील मुल्यांशी सुसंगत वागले पाहिजे.

”आम्ही लोक” ही फक्त संविधानाची सुरुवात करणारे तीन शब्द नाहीत तर त्याच्या गाभ्यातील आशयाचे रक्षक देखील आहेत.

माननीय राज्यपालांच्या भाषणाच्या उत्तरादरम्यान, माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी भारत जोडो अभियानाचा अनेकदा उल्लेख केला आणि आमच्या कार्यांना देशहिताच्या विरुद्ध असल्याचे ठरवले. हे पहिल्यांदा नाही, त्यांनी निवडणूक प्रचारादरम्यानही भारत जोडो अभियानाला लक्ष्य केले होते आणि लोकसभा निवडणुकीतील त्यांच्या पक्षाच्या पराभवाला जबाबदार धरले होते.

भारत जोडो अभियान पुन्हा एकदा हे सांगू इच्छिते की, ८ नोव्हेंबर २०२४ रोजी दिलेल्या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे, श्री. फडणवीस यांनी त्यांच्या पक्षाविरोधातील व्यक्तींविरोधात खोटे आरोप करण्याऐवजी, भारत जोडो अभियानाच्या पदाधिकारी आणि सदस्यांविरुद्ध ठोस आरोप आणि पुरावे सादर करावेत. भारत जोडो अभियान हे ”माओवादी संघटनांचे फ्रंटल ऑर्गनायझेशन” असल्याचा दावा केल्यावर, त्यांनी अशा संघटनांची यादी सादर करावी आणि ज्या आंतरराष्ट्रीय बैठकींचा त्यांनी उल्लेख केला त्यामध्ये सहभागी झालेल्या भारत जोडो अभियानाच्या सदस्यांची नावे जाहीर करावीत.

महाराष्ट्रातील भारत जोडो अभियानाचे कार्यकर्ते आणि संघटना, ज्यांनी लोकशाही टिकवण्यासाठी अतुलनीय जनचळवळ उभी केली आहे, यांचा आम्हाला अभिमान आहे. आम्ही गप्प बसणार नाही किंवा दडपले जाणार नाही आणि संविधानिक मूल्ये आणि लोकशाही संस्थांचे संरक्षण व प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही कायदेशीर, शांततामय आणि लोकशाही पद्धतीने काम करत राहू. महाराष्ट्राची जनता भारताच्या एका थोर सुपुत्राची गर्जना अद्याप विसरलेली नाही: ”स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे”. जय हिंद!

विशेष

ऐंशी वर्ष जुनी वृद्ध विश्व बँक - त्यातून भारताची वृद्धी कि बरबादी?

मेधा पाटकर

विश्व बँकेची ८० वर्षपूर्ती है महोत्सवाचे कारण बनले. जगभरचे शासनकर्ते व भांडवल– शाही व्यवस्थेच्या वाहकांसाठी निश्चितच ! मात्र अनेकानेक जनसंघटनांनी यानिमित्ताने विश्व बँकेचा इतिहास पाहिला तो आठ दशकात या सावकारी संस्थेचा, इतर अनेक भांडवली गुंतवणूकदारांशी जोडून झालेल्या भारत व एशिया खंडातील नेपाळ सारख्याही देशातील जल, जंगल, जमिनीबरोबरच जीवनापर झालेल्या परिणामांचा. डिसेंबर २०२४ मध्येच कलकत्ता येथे आयोजित आंतरराष्ट्रीय 'जनअदालती' पुढे झालेल्या प्रस्तुतीद्वारा पुढे आली ती विश्व बँकेची भारतासारख्या देशातील अर्थव्यवस्थेतीलच नव्हे तर 'लोकशाही' म्हणून नावाजलेल्या राजकीय प्रक्रियेतील घुसखोरी! विकासाचे विविध प्रकल्प पुढे रेटताना, वैश्विक धन बळाद्वारा रेटलेले कायदे धोरणांतील बदलच नव्हे, तर भारतीय कायद्याचे उल्लंघनही ! स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी दिलेले लढे तसेच 50 वर्षपूर्तीच्या निमित्त जागतिक पातळीवर जनशक्तीसह उठलेला आवाज – '50 years is enough' - पुन्हा एकदा दुमदुमला – '८० वर्षानंतर आता रोखूया – वैश्विक दडपशाहीला !

विश्व बँक ही आंतरराष्ट्रीय वित्तीय फंड (आयएमएफ) बरोबर दुसऱ्या महा युद्धानंतरच्या अनेक युद्धग्रस्त देशात पसरलेल्या आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर स्थापित झालेली संस्था, अर्थातच उद्देश हाच होता की त्या देशातील कंपन्यांना, भांडवली गुंतवणूकदारांना वाव मिळावा, जगभरातील अर्थव्यवस्थेचे दरवाजे उघडून सर्वत्र पसरण्याचा. तिथल्या सरकार व जनतेला ग्राहक बनवून फायदा कमावण्याचा ! हेच आजवर चालत राहिले व विश्व बँकेची बॅलन्स शीटही कधी नुकसान दाखवणारी नव्हेच, तर २०२४ मध्येही ५०० दशलक्ष डॉलर्सना नगद लाभ दाखवणारीच राहिली. विश्व बँकेच्या तीनही शाखा - IBRD, IDA व IFC या आंतरराष्ट्रीय भांडवलाद्वारा विकास साधण्याचाच उद्देश दर्शवितात. एक शाखा कमी तर दूसरी अधिक व्याजदराने पण 'विकासा'साठी म्हणूनच कर्ज वा अनुदान देतात. एक शाखा – IFC - ही खासगी कंपन्यांना देते अर्थसहाय्य. भारतात Foreign Exchange च्या संकटकाळात कधी १९८७ मध्ये तर अलिकडे कोरोनाच्या प्रभाव काळातही विश्व बँकेचे, धनवाटप वाढले आणि त्याच पोटी भारतीय अर्थव्यवस्थेचे वैश्विकरण व कॉर्पोरेटीकरणही !

विश्व बँकेने भारतास दिलेले अर्थसहाय्य हे गेल्या अनेक वर्षापासून केवळ प्रकल्पांना नव्हे तर विविध क्षेत्रांना (sector wise) दिले जाते. २०२३ च्या वाटपाचा आढावा घेतला तर कळते की यामध्ये सामील आहेत, आर्थिक नीति व 'खाजगी क्षेत्र – खाजगीकरणाचा – विकास', 'सार्वजनिक क्षेत्र व्यवस्थापन' ही!' या क्षेत्रांमध्ये नेमके काय साधले जाते आहे, याचा आढावा घेण्याइतकी पारदर्शकता आर्थिक व्यवहार व करारांबाबत नसल्याने जनता अंधारात असली तरी चमकते खाजगीकरण व त्यापोटी भोगणारी बीभत्स विषमता तर जाणतेच ! विश्व बँकेचे भारतास २ ते ४ अरब वरून १० अरब डॉलर्सवर गेलेले धनवाटप हे २४% पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन हणजे लोकप्रशासनासाठी, ऊर्जा क्षेत्रासाठी १४% व कृषि क्षेत्रासाठी ११%, जलनियोजनासाठी ८% असे राहिले आहे. या संपूर्ण कर्जवाटपापोटी २०२२ मध्ये १५ अरब तर २०२३ मध्ये २२.५४ अरब डॉलर्स कर्जावरचे व्याज भारत देत आहे आणि आता पूर्वीपेक्षा अधिक दीर्घकालीन कर्ज घेते आहे. विश्व बँकेशी गठबंधन सतत राहिले आहे, अन्य द्विराष्ट्रीय व बहुराष्ट्रीय वित्तीय संस्थांचेही. विश्व बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्पास, ध्येय धोरणास त्यांच्या निर्णयासच मान्य करून, अन्य काही मूल्यांकन, विचार न करता सहाय्य दिले जाते. त्यामुळेच विश्व बँकेचा आंतरराष्ट्रीय कर्ज अहवाल दर्शवितो की विदेशी कर्जाचे प्रमाण ३१ अरब वरून आता ६४७ अरब डॉलर्सवर पोहोचले आहे! यात वैश्विकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या ८० च्या दशकापासून भारतीय नागरिकांवर थोपवल्या गेलेल्या आर्थिक धोरणाचे प्रतिबिंब तर आहेच. परंतु या कर्जापोटी, अनुदाना– पोटीही एकेका क्षेत्रामध्ये प्रगती कुठल्या दिशेने झाली आहे, तेही जनता जाणतेच! समता -

न्यायासारख्या संविधानातील मूल्यांच्या पर्यावरण संरक्षणा सारख्या, संविधानातील मार्गदर्शक तत्वाच्या की विषमता, विनाश, विस्थापनाच्या?

कृषिक्षेत्रामध्ये तीन कायदे झाले ते कंपनीकरण व कंत्राटीकरणालाच प्रोत्साहन देणारे, म्हणूनच तर ७५० शेतकऱ्यांची शहादत स्वीकारून १३ महिने लढलेल्या शेतकऱ्यांनीच ते परतवले. तरीही आज किमान हमीभाव, प्रत्येक शेती उत्पन्नाला देण्याचा कायदा आला नाही म्हणून देशभर संघर्ष व दल्लेवालजीसारख्या किसान नेत्यासही गेले २८ दिवस उपोषण करावे लागते आहे तर नोएडासह एकेका ठिकाणी निसर्गनिर्भर समुदाय, शेतकरी व आदिवासीही भोगताहेत दमन, अत्याचार! याहीपेक्षा विशेष हेच की केंद्रीय शासन, पुन्हा त्याच ३ कायद्यांतील किसानविरोधी बाबी पुढे आणणारी नवी 'राष्ट्रीय कृषिव्यापार नीति' पुढे आणू पहात आहे. कृषि हा विषय संविधानातील सातव्या अनुसूचीनुसार राज्य शासनाच्या कक्षेत येत असतानाही, केंद्र सरकार त्यांच्या सहभागा व सहमतिविना असे धोरण आणू पहाते तर तो संघात्मक राज्यरचनेचाच नव्हे तर जनप्रतिनिधींचा व जनतेचा विशेषत: शेतकरी समुदायाचाही अपमानच ना? हे करण्याची हिंमत व बळ हे वैश्विक सावकारी समर्थनातूनच मिळते, यात शंकाच नाही! सार्वजनिक कंपन्यांची हजारोंची संपत्ती शेकडोत विकून व सार्वजनिक क्षेत्राचे लाभ संपुष्टात आणत, जनजनांना वंचित करून होणारे खाजगीकरण आणि कृषिउत्पन्नांची आयात त्यावरील आयात कर कमी करून वाढवणारे करार हे पुढे रेटले जात आहेत. वीजनिर्मिती व वाटपही कंपनीकरणवादी होऊन नवा कायदा विजेचे दर वाढवणारा आणला जात आहे..... हे सारे वास्तव विश्व बँकेचे व अन्य आंतरराष्ट्रीय सावकारी भागीदारी पोटी, त्यांच्याच कंपन्यांना, शासकांना लाभार्थी बनवते, याचा उहापोह करण्याइतकी जनतेमध्ये जागृती आणण्याची गरज आहे, हेच खरे!

विश्व बँकेची धोरणे, विचारधारा व नियमावलीतही आर्थिक सामाजिक न्यायाचा आग्रह दिसतो हे निश्चित. विश्व बँक कुठल्याही राष्ट्राचे शासनकर्तेच नव्हे तर जनतेचाही सहभाग घेते, असेही दर्शवते. प्रत्यक्षात कुठल्याही देशाच्या विश्व बैंक सहाय्यित प्रकल्पात, राष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याच्या जबाबदारीतून तिची मुक्ती, आंतरराष्ट्रीय न्यायालयांकडूनही मान्य केली जाते, याची उत्तम उदाहरणे आहेत, नर्मदेवरील सरदार सरोवर प्रकल्प, आंध्र प्रदेशातील अमरावती राजधानी प्रकल्प, मुंबईतील शहरी परिवहन प्रकल्प तसेच गुजरात – कच्छ मधील टाटा – मुंद्रा प्रकल्प. विश्व बँकेने शासनास वा कंपनीस कर्ज मंजूर करताच दरवाजे उघडतात, कायद्याचे, न्यायाचे पालन करण्याचे नव्हेत तर प्रकल्प पुढे रेटण्याचे... कुणालाही कितीही किंमत मोजावी लागली तरीही! टाटा – मुंद्रा तापविद्युत परियोजनेमुळे १०,००० मच्छीमार कुटुंबे बाधित झाली तरी त्यांची दाखल ना शासन वा कंपनीने घेतली, ना स्वत: बँकेने! अमेरिकेतील कोर्टापर्यंत जाऊन जिंकल्यानंतर विश्व बँकेने अपील याचिकेत निर्णय मिळवला आणि त्यांची गैरजबाबदारी मान्य होऊन आजवर मच्छिमार वंचितच आहेत; तागाच्या गोण्यांची घरे बांधून राहण्यास मजबूर आहेत. २०१७ चा अमरावती राजधानी प्रकल्प जनतेने आणि अनेक राज्यकर्त्यांनी आमच्या जाहीर सभेत उपस्थित राहून प्रश्नांकित केला. देशभरातली जन संघटनांनी जन लढ्यास पाठिंबा देऊन, नर्मदेच्या लढ्यानंतर स्थापित केल्या गेलेल्या विश्व बँकेच्या अंतर्गत पर्यवेक्षक दल (inspection panel) पर्यंत पोहोचलेल्या अमरावती प्रकल्पाचा (जसा टाटा – मुंद्राचाही) सखोल अभ्यास होऊन त्या पर्यवेक्षकांनी प्रकल्पाचे वित्तीय सहाय्य रद्द करवले... २०१९ मध्ये! आश्चर्य हेच की पुन्हा चंद्राबाबू नायडू या प्रकल्प संस्थापक नेत्याच्या हाती सत्ता येताच, २०२४ मध्ये विश्व बँकेने पूर्वीचे ३०० दशलक्ष डॉलर्स सहाय्य असताना, आता ८०० दशलक्ष डॉलर्स मंजूर केले! पर्यवेक्षक दल म्हणजे विश्व बँक सहाय्यित कुठल्याही प्रकल्पासंबंधीचे 'तक्रार निवारण प्राधिकरण'! मात्र त्याचे अहवाल व निर्णय प्रकल्पाच्या परिणामावरच नव्हे तर विश्व बँकेच्या स्वत:च्याच नीतिगत निर्णय व अटींच्या उल्लंघनावर टीका करणारे येत गेले व त्यांच्या आणि बँकेच्या प्रशासकांमध्ये द्वंद्व उभे राहिल्याचे मी एका अहवालाच्या प्रकाशन सभेत आमंत्रित झाल्यावर अनुभवले.

भारतातील अनेक प्रकल्पांमध्ये हेच आढळले तर नर्मदा आंदोलनाचा किमान ८ वर्षांचा अनुभव हा ही फार महत्वाचा ठरतो. सरदार सरोवरासच नव्हे तर नर्मदा खोऱ्यातील ३० मोठ्या, १३५ मध्यम प्रकल्पांच्या भव्य दिव्य योजनेत शिरण्याची

आकांक्षा घेऊन सरदार सरोवराच्या १९८० च्या दशकात मान्य केलेल्या ४२०० कोटींच्या किमतीपैकी मात्र ५% राशी देऊन विश्व बँकेने सावकारी हित साधले. प्रकल्पाचा सामाजिक, पर्यावरणीय परिणामांचे काय खया खुया लाभ – हानीचेही मूल्यांकन तेव्हा झाले नव्हते. १९८३ मध्ये टी.एन. शेषन सारख्यांच्या नेतृत्त्वाखाली आणलेल्या 'नदी खोरे मार्गदर्शिके'चेच काय, १९७४ ते १९८७ मध्ये दिल्या गेलेल्या मंजूरी मध्ये पुनर्वसन, विविध पर्यावरणीय आघात व त्यांच्या हानिपूर्तीचे अभ्यास आणि नियोजन दोन वर्षात पूर्ण करण्याची अट घातली गेली होती आणि १९८८ मध्ये योजना आयोगाच्या ६४८० कोटींच्या या प्रकल्पाबाबत तीच'री' पुढे ओढली गेली होती. मात्र सर्वाधिक स्पष्ट होते हकिकत, ती विश्वबँकेनेच १९८५ मध्ये प्रकल्प सहाय्यास मंजुरी दिली व केंद्र आणि तीन – मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजराच्या शासकांसह करार केले, त्याचा आधार मानलेल्या बँकेच्याच अध्ययन अहवालातूनच ! या Appraisal मध्ये जोडपत्र होती ते अनेक विषयांचे अभ्यास व संबंधित नियोजन बाकी असल्याची यादी. याच स्थितीत लाभ अपेक्षेपेक्षा कमी झाले व प्रकल्पाची किंमत वाढली तर लाभ–हानिचा अपूर्णांक (तेव्हा १.३४ किमान दर्शविलेला) हा नकारार्थी (-ve) होऊ शकतो व 9०9 च्याही खाली जाऊ शकतो, हे मांडून प्रकल्प मात्र पुढे रेटण्यास मदत केली.

विश्व बँकेच्या मागोमाग जपानची OECF, ब्रिटनची ODA, कॅनडाची CIDA, स्वीडनची SWIDA.... अशा अनेक द्विराष्ट्रीय वित्तीय संस्थांनीही, प्रकल्पाच्या वेगवेगळ्या कार्यासाठी सहाय्य देणे स्वीकारले, तेही केवळ विश्व बँकेच्याच निर्णयाला आधार घेऊन. खो–यातील आदिवासी, शेतकरी, मजूर, कारागीर, व्यापारी.... सर्वसर्व.. महाराष्ट्रापासून ते मध्यप्रदेशात सर्वाधिक (१९२ गावे व नगरातील) आणि गुजरातमधील विस्थापित होऊ घातलेल्या समुदायांनी आवाज उठवला तेव्हा पुढे गेले विविध अभ्यास; पुढे गेले तरी ना अभ्यास सर्वांगी व संपूर्ण झाले, ना पुनर्वसन ! मात्र प्रकल्पाची किंमत पुढे जाण्याची घोषणा अखेरीस गुजरात विधानसभेतील अर्थमंत्र्यांच्या भाषणानुसार १०,००० कोटीवर गेल्याचे कळले. तेही धरणाच्या किंमतीत 'स्टॅच्यू ऑफ यूनिटी' नावाने गाजलेला, सरदार पटेलांचा पुतळा व विविध दिखाऊ पर्यटन प्रकल्पांचीही किंमत धरल्याने ! पुनर्वसन ही मिळाले, देश व दुनियेतील कुठल्याही धरणग्रस्तांच्या तुलनेत, सरदार सरोवर ग्रस्तांना, ते केवळ ३१ वर्षाच्या संघर्षातूनच.. ...जो आजही सुरु आहे, ५०००० परिवारांना वसवल्यानंतरही उर्वरित कुटुंबे व कार्यासाठी !

यात विश्व बँकेचा वाटा तरी काय? या प्रश्नाचे उत्तर दीर्घ संघर्षाची हकीकत कळल्यावरच ! थोडक्यात सांगायचे तर हेच की विश्व बँकेने मंजूर केला, तर तुम्ही कसे उठवता प्रकल्पावर प्रश्न ?.... विश्व बँक तर मात्र 'अर्थदाता', तुमचा देश व तुमचेच सरकार 'अर्थघेता–जबाबदार' असे उत्तर देणाऱ्या बँकेच्या अनेक अधिकाऱ्यांना, खोऱ्यात यावे लागले. जगातील अमेरिकेसह ब्रिटन, जर्मनी, जपान, फिनलँड सारख्या अनेक विकसित मानल्या गेलेल्या देशांतील सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणवादी, संस्था – संघटनांनी प्रश्न उठवले. आम्हाला बरोबर घेऊन विश्व बँकेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांना भेटून व वार्षिक सभेच्या बाहेर पर्यायी मंच उभा करून, अमेरिकेच्या कृषि, विज्ञानावरील संसदीय समिती पुढे सुनावणी झाली यानंतर अध्यक्षांचे तार – पत्र बँकेच्या अध्यक्षांना गेले. त्याच अध्यक्षांनी, श्री. कोनाबल यांनी भारतात येऊन सुंदरलाल बहुगुणा, थॉमस कोचेरी इ. सह आमची सुनावणी केली होती. विश्व बँकेच्या दिल्लीतील ऑफिसबाहेर नर्मदेतून पोहोचलेल्या आदिवासी व अन्य स्त्री–पुरुषांनी केलेल्या धरणे कार्यक्रमावर कधी लाठी चार्म– दमन नाही झाले तर उपाध्यक्ष मोइन कुरेशीसारख्यांशी चर्चा झाली होती. या पार्श्वभूमीवर एक उच्चस्तरीय पुर्नविचार आयोग नेमला गेला.... संयुक्त राष्ट्र संघातील अधिकारी ब्रॅडफोर्ड मोर्सच्या अध्यक्षतेखाली, ज्यात कॅनडाचे न्यायाधीश थॉमस बर्जर, मानववंश शास्त्रज्ञ व पर्यावरणवादीही होते. या आयोगाने अशा एका महाकाय धरण प्रकल्पावर अभ्यास केला. शासनाच्या बरोबरीने आमच्यासह खोऱ्यात पोहोचून सारे कागदपत्र अभ्यासून दिलेल्या अहवालातून विश्व बँकेची पुरी 'पोलखोल' केली. बँकेच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रातून स्पष्ट केले की, "विस्थापन, पर्यावरणीय परिणामांचेच काय तर नर्मदेत उपलब्ध पाण्याचेही परिपूर्ण मूल्यांकन व नर्मदेच्या खोऱ्यात योजलेल्या एक नव्हे तर अनेक प्रकल्पांच्या एकत्रित परिणामांचे अध्यायन केले नसताना, बँकेने अर्थसहाय्य मंजूर केले. प्रकल्पाला

लाभही खरा न ठरण्याची व हजारो विस्थापितांचे पुनर्वसन न होता, अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुजरातमधील प्रकल्प कॉलनीसाठी, कालव्यांसाठी ज्यांची जमीन संपादित झाली, त्यांना प्रकल्पग्रस्त मानून पुनर्वसित करायला हवे.... भूमीहीन आदिवासींना हक्क द्यायला हवे...'' विश्व बँकेलाही सुनावलेच की, 'तुमच्याच नीति नियमांचे उल्लंघन झाले आहे; तर अशा प्रकल्पातून पाय मागे घ्या.' अखेर विश्व बँकेला हटवण्यासाठीही संघर्ष व संचालकांशी आमचा संवाद नव्हे तर त्यांच्या अंतर्गत प्रक्रियेद्वाराही मोर्स कमिटीचे निष्कर्ष खरे मानून बहुमताने झालेल्या निर्णयाने विश्व बँक सरदार सरोवर मधून हटली. मात्र प्रकल्प पुढेच गेला; आणि लढा चालूच ठेवावा लागला. मात्र post – facto म्हणजे प्रकल्पानंतर लाभ – हानीचे सर्व गणित चुकल्याचे शाबीत झाले तरी विश्व बँकेला आरोपी कोण, कसे, कुठल्या मंचावर ठरवणार ?

हे चित्र विश्व बँकेच्या व विदेशी भांडवलाच्या गुंतवणूकीनेच होते, हे नेपाळच्या अरुण प्रकल्पामुळेही साबित झाले. मात्र आता एकेका प्रकल्पाऐवजी एकेका 'सिंचन जलनियोजन' सारख्या क्षेत्राला सावकारी संस्थांनी मोठा फंड दिला तर प्रकल्पानंतर त्यांच्या भूमिकेचा, हस्तक्षेपाला आढावा घेताना, त्यांना जबाबदार तरी कोण, कसे धरणार? यांना केंद्रीय नियोजन आयोगातही स्थान देऊ नये, अशी भूमिका वाममोर्चाने काँग्रेस शासन असताना नाकारली, तेव्हा तेही उत्तर होते, ''ठीक आहे. आम्ही समितीत न घेता त्यांचा सल्ला घेत राहू.'' आज हे सारे प्रकरण फार पुढे गेले आहे, ते G - 20 सारख्या मंचावर भारत देशास नव्हे तर प्रधानमंत्रींना नेतृत्व मिळेपर्यंत! त्यांसाठी आलेल्या राष्ट्र प्रमुखांनी गांधी समाधीवर माथा टेकला तरी त्या कार्यक्रमासाठी झोपडपट्ट्या झाकल्या गेल्याच परंतु भारतीय जनतेचा आक्रोश व प्राधान्य, संविधानातील मूल्यं, सार्वभौम राष्ट्र व लोकशाहीतील विकासाच्या समतावादी स्वावलंबी विकासाचा आग्रह....सारे दडपलेच गेले ना? विदेशी संस्था बरोबर करार मदार होताना विधानसभा वा संसदेची (राज्य व आंतरराज्य स्तरीय परिणाम आणणारे असूनही) सहमति घेतली जात नाही, हीही शोकांतिकाच आहे!! मग सर्वसामान्यांना अगदी प्रकल्प ग्रस्तांनाही कोण घेतं विश्वासात? कानूनी व मैदानी संघर्षाविना, कठे सहजासहजी होते माहिती व निर्णय उपलब्ध? कोरोना काळात विश्व बँकेने २०२० मध्ये IBRD तर्फ स्वास्थ्य संचालनासाठी ३५० दशलक्ष डॉलर्स, IDA तर्फे स्वस्त कर्ज, सामाजिक सुरक्षेसाठी ७५० दशलक्ष डॉलर्स व IFC तर्फ कंपत्यांना ३४.४० दशलक्ष डॉलर्स दिले, तर एशिया विकास बँकेने एकूण १.५ अरब व दशलक्ष डॉलर्स आणि एशिया इन्कास्ट्रक्चर डेव्हलपमेंट बँकेनेही १२५० दशलक्ष डॉलर्स दिले! या सर्वांतर्फे खरोखर स्वास्थ्य सेवा व सुरक्षा किती वाढली, कुठल्या प्रकारच्या संरचना निर्माणावर खर्च झाला व जनतेतील कुठल्या व किती बेरोजगारांना, स्वास्थ्य, शिक्षेपासून वंचित झालेल्या समुदायांना लाभ मिळाला, याचे विश्लेषण एखाद दुसऱ्या संस्था–संघटनेने केले तर नकारात्मक अहवालच पुढे आले.

या सर्व परिस्थितीत विदेशी कंपन्यांना अधिक वाव मिळत आहे तसेच आयात–निर्यातीवर आधारित अर्थव्यवस्था स्थानीय स्वराज्य संस्थांचा अधिकारही नाकारत आहे. देशातील स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात आणले गेलेले शेतकरी, कष्टकरी, आदिवासी, दलित समुदायांना अधिकार देणारे कायदे रद्द होत आहेत वा बदलले जात आहेत. वैश्विक भांडवलाच्या कर्जाच्या आधारेच नव्हे तर विश्व बँकेतही एकेका राष्ट्राचे शेअर्स किती या आधारे निर्णय घेतले जात आहेत. यात अमेरिकेसारखा देश २०% तर भारतासारखा देश ४ ते ५% च जर मतदानाचा हक्क मिळवत असेल तर विश्व बँकेच्या अंतर्गतही लोकतंत्राचा अभावच आहे, ज्याची खंत वैश्विकरण–खाजगीकरणाच्या धोरणास पाठिंबा असलेले, स्वत: विश्वगुरु सारखे पद व सन्मान मिळवू पहाणारे यांना नसेल तरी आपणास असणे गरजेचे आहे.

सर्वात गंभीर बाब आहे ती विकासाची दिशा व दशा अशा पाश्चिमात्य प्रभावाखाली बदलल्यानेच, उपभोगवाद, पूंजी - बाजारवाद व त्यापोटीच वंचना, शोषण, विषमता वाढत असण्याची. तशीच चिंता आहे अशा विकास योजना, त्यामध्ये निवडले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान, केंद्रीकरण व औद्योगिकरणाच्याच आधारे रेटल्या जाणाऱ्या विकासामुळे जल वायू परिवर्तन व सर्व मानवनिर्मित संकटे, याविषयीची ! या साऱ्याचा प्रभाव झेलणाऱ्या कष्टकऱ्यांची! म्हणूनच पुन्हा आस हवी, परिवर्तनाची, ज्यासाठी 'विकासा' चे

(पान २९ वर)

टिप्पणी

पंजाब विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आमचा पाठिंबा

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय

जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयाच्या, ऑल इंडिया इंकिलाबी यूथ अँड स्टुडंट अलायंस या संघटनेचा आणि देशातील शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षकांचा पंजाब विश्वविद्यालयातील विद्यार्थी सिनेट निवडणुका घेण्यासाठी आणि संस्थेत लोकशाही पद्धतीने कार्य चालावं म्हणून करत असलेल्या आंदोलनाला पाठिंबा आहे.

गेल्या ३६ दिवसांपासून पंजाब विश्वविद्यालयातील विद्यार्थी सिनेट निवडणुका ताबडतोब घेण्यात याव्या म्हणून 'पंजाब युनिव्हर्सिटी बचाओ मोर्चा' या बॅनर खाली एकत्रित येऊन आंदोलन करत आहेत. पंजाब युनिव्हर्सिटीच्या सिनेट मध्ये ४७ निवडून आलेले आणि ३६ नामनिर्देशित सदस्य आहेत; तसेच पंजाब विश्वविद्यालयातर्फे २ सभासद आणि ६ पदसिद्ध सभासद आहेत. सिनेटची जबाबदारी आहे की विश्वविद्यालयात धोरण आखणी आणि प्रशासकीय निर्णय हे लोकशाही पद्धतीने व्हावेत हे बघणे. सिनेटचा जन्मच पंजाब विश्वविद्यालयाच्या कल्याणासाठी झाला आहे. आधीची सिनेट ३१ ऑक्टोबर २०२४ ला संपुष्टात आली. त्यानंतर पुढच्या नवीन सिनेटच्या निवडणुकीची कुठलीही सूचना जाहीर करण्यात आलेली नाही. ही गोष्ट म्हणजे संस्थेच्या लोकशाही पद्धतीसाठी धोक्याची घंटा आहे. म्हणूनच विद्यार्थी आंदोलन करुन मागणी करत आहेत की नवीन सिनेटची निवडणुक ताबडतोब जाहीर करावी. विद्यार्थ्यांना भीती आहे की सिनेटच्या अनुपस्थितीत विश्वविद्यालयाचे कार्य अनियंत्रित अधिकारवाणीने चालेल. विद्यार्थ्यांना असंही वाटतं आहे की निवडणुका घेण्यात होत असलेली दिरंगाई म्हणजे केंद्र सरकार पंजाब विश्वविद्यालयाला स्वत:च्या अधिकारात आणि खाजगीकरणाच्या दिशेकडे नेत आहे. निवडणूक कधी घेणार असे परत परत विचारूनही विद्यार्थ्यांना या वर काही प्रतिसाद मिळाला नाही तेव्हाच त्यांनी निषेध आणि आंदोलन सुरु केले. विद्यार्थ्यांनी या बद्दल चर्चा करण्यासाठीं कुलगुरूंच्या घरावर १३ नोव्हेंबर रोजी मोर्चाने जाणार असल्याचे कळवले. पण त्यांना सांगितले गेले की कुलगुरू घरात नाहीत; त्या 'पंजाब व्हिजन २०४७' या सेमिनरला गेल्या आहेत जिथे अनेक सरकारी अधिकारी उपस्थित आहेत. मग विद्यार्थ्यांनी लॉ ऑडिटोरियम येथे चालू असलेल्या या सेमिनारला जाऊन कुलगुरूंना भेटण्याचे ठरवले. त्यावेळी विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांना पाचारण केले आणि या विद्यार्थ्यांवर चंदिगढ पोलिसांनी निघृणपणे लाठीमार केला. या मोर्चात सहभागी असलेल्या विद्यार्थिनींना सुद्धा लाठीमार करुन त्यांच्याशी पुरुष पोलीसांनी शारीरिक अतिरेक केला. चंदिगढचे पोलिस डेप्युटी अधिक्षक यानी धमकी दिली की गरज वाटली तर आम्ही गोळीबार करू. लाठीमार झालेल्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी न घेता उलट त्यातील सारा, मनिका, अश्मित सिंग, रिमलजोत सिंग, गुरविंदर, नवतेज सिंग, संदीप सिंग, अवतार सिंग, जोबन, गगनदीप आणि करनवीर यांसकट १४ विद्यार्थ्यांवर FIR फाइल केला.

विश्वविद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी खोटी अफवा पसरवली की विद्यार्थी पंजाब मुख्यमंत्री भगवंत मान यांना घेराव घालण्यासाठी जात होते. पण विद्यार्थ्यांना फक्त कुलगुरूंना भेटायचे होते कारण आदल्याच दिवशी विद्यार्थी पंजाबचे मंत्री हरजोत सिंग बेन्स यांना भेटले होते. बेन्सनी विद्यार्थ्यांना आश्वासित केले होते की ते योग्य कारवाई करतील. त्याच दिवशी संध्याकाळी भगवंत मान यांनी कुलगुरूंना पत्र लिहून ताबडतोब सिनेट निवडणुका घेण्याचे आदेश दिले.

विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कुलगुरूंना भेटण्याचा हक्क आहे. अधिकाऱ्यांच्या एककल्ली निर्णयांविरुद्ध निषेध करणे आणि आंदोलन पुकारणे हा विद्यार्थ्यांना लोकशाही अधिकार आहे. पोलिसांनी विद्यार्थी आणि विश्वविद्यालय यांच्या मध्ये पडून मुलांना मारहाण करणे संतापजनक आहे. या विद्यार्थ्यांनी आपली चळवळ चालूच ठेवली आहे आणि दाखवून दिले आहे की अशा दहशतीने विद्यार्थी चळवळ दडपली जात नाही. २६ नोव्हेंबरला विद्यार्थ्यांनी FIR मागे घेण्यासाठी विश्वविद्यालयाचे गेट २ बंद करण्याचे जाहीर केले तर त्यांच्यावर पुन्हा लाठीमार करण्यात आला. संविधान दिनी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांना मारहाण

केली जाते हे उपरोधिक आहे.

आम्ही, भारतातील विद्यार्थी, युवा आणि शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षक खंबीरपणे पंजाब विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपाठी उभे आहोत आणि मागणी करतो की सिनेटच्या निवडणुका तातडीने घेण्यात याव्या आणि त्यात आरक्षणाच्या धोरणाचे कटाक्षाने पालन करावे. आम्ही विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीमाराचा आणि विद्यार्थिनींवर झालेल्या शारीरिक अतिरेकाचा तीव्र निषेध करतो आणि असे अत्याचार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई व्हावी अशी मागणी करतो. विद्यार्थ्यांच्या मतभेदाच्या आणि निषेध व्यक्त करण्याच्या अधिकाराचे समर्थन करतो आणि त्यांच्यावर लादलेले FIRs ताबडतोब मागे घ्यावेत अशी मागणी करतो.

(All India Inquilabi Youth and Students Alliance - ALIYSA)

(साने गुरुजी १२५ अभियान: पान १७ वरुन)

पीपल्स फ्रंट, मध्य प्रदेश मधला जयेश, समता संघटना आणि मागास व अल्पसंख्याक समाज कर्मचारी महासंघ. यापैकी बहुतेक प्रयोगांचे सर्जनशील आयुष्य खूपच लहान होते, तरीही यापैकी अनेक संस्था आजही अस्तित्वात आहेत. देशभरात सखोल राजकारण घडवण्याच्या गरजेची आणि खरे तर शक्यतांची ते साक्षच देतात. जेव्हा आपण तरुणांमध्ये नागरी सहभाग नसल्याबद्दल शोक व्यक्त करतो, राजकीय उदासिनतेसाठी त्यांच्यावर दोषारोप करतो किंवा त्यांच्या राजकीय कट्टरतेच्या मान्यतेचा आपल्याला धक्का बसतो, तेव्हा आपण स्वत:ला विचारले पाहिजे: आपण घटनात्मक मूल्ये जोपासणाऱ्या संस्था उभारल्या आहेत का? सध्याच्या काळात संयुक्तिक ठरतील अशी अभ्यास मंडळे कुठे आहेत? तरुणांना विधायक कार्याकडे कोणी आकर्षित करतंय का? त्यांच्या दैनंदिन समस्या आणि चिंता मोठ्या राजकारणाशी कोणी जोडतंय का? समस्या तरुणांची नाही तर आमची आहे. आमच्याकडे मॉडेल आहे. मुद्दा, खूप उशीर होण्याआधी त्यावर कृती करण्याचा आहे. हे आहे आपल्या पुढचे आव्हान, खरे तर जीवनकार्य आहे; जे आपल्या काळातील साने गुरुजींच्या शोधात आहे!

yyopinion@gmail.com

अनुवाद: मीनल उत्तुरकर

meenalutturkar16@gmail.com

(साने गुरुजी १२५ अभियान: पान १९ वरुन)

कार्यक्रम देण्याची. गुरुजींनी दिलेले कार्यक्रम सकसपणे चालविण्याची व तळागाळातील जनतेची दु:ख मिटविण्याची. हे करण्यासाठी फक्त पुण्या–मुंबईत कार्यक्रम होउन चालणार नाही तर यासाठी गरज आहे किमान महाराष्ट्रातील वाड्या, वस्त्या, तांडे, टोले, पाडे आदींवर जाण्याची. यासाठी संस्था, संघटना, बॅनर, पद, प्रसिद्धी, पैसा आदींची बंधने, मर्यादा ओलांडाव्या लागतील.

९८२२२५४५७५

(विशेष: पान २७ वरुन)

नियोजन हे विकेंद्रित, जनतांत्रिक व जनवादी निर्णय प्रक्रियेतून, समता – सादगी - स्वावलंबनाच्या मूल्यांवर आधारित व्हावे लागेल. राष्ट्रांबरोबरच जनतेची सार्वभौमता जपावी लागेल. आणि यासाठीच विश्व बँकेसारख्या सावकारी संस्थेचे कर्जदार आणि कायदे, धोरणे, शासन व्यवस्था व अर्थव्यवस्था तसेच पर्यावरणीय संरक्षणाच्या बाबतीतही गुलाम बनून चालणार नाही. अशा संस्थांना जनतंत्राने चालणे, केवळ भारी संकटकाळात मदतीचा हात दिला तरी राष्ट्राच्या सार्वभौमते– बरोबरच संविधानावर मात करून देणे, आणि आयात–निर्यातीवर कमीतकमी व देशहिताचे म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्याच हिताचे लक्ष्य ठेवूनच अर्थव्यवस्थेचे अवलंबन हे किमान मर्यादितच ठेवणे हेच गरजेचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रीय स्थितीची संवैधानिक व मानवी अधिकारांच्या चौकटीत चर्चा – विचार व शहानिशा झाली. तशीच विश्व बँकेच्या ८० वर्षपूर्तीच्या निमिताने आंतरराष्ट्रीय पूंजी, बाजार, कर्ज दारी व सावकारीच्या प्रभाव–दावाबाबतही गंभीर विचार व निर्णय जनतेने, जनसंघटनांनी, आंदोलनजीवी, समाज–वादींनी घेणेच आवश्यक आहे. महिनाभरापूर्वी झालेल्या आंतरराष्ट्रीय ‘जनअदालत‘च्या अहवालाद्वारा हे होणे अशक्य नाहीच!

medha.narmada@gmail.com

आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान।
शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण!!
– साने गुरुजी

पर्यावरण

पर्यावरणीय संकट व सामाजिक न्यायासाठी राज्यस्तरीय मंचाची स्थापना

डॉ. सुहास कोल्हेकर

गेल्या काही वर्षांपासून आपण पर्यावरणीय संकटाची (climate crisis) तीव्रता आणि त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम विशेषत: तापमानात होणारी वाढ आणि पर्जन्यमानातील बदल पाहत आहोत. तापमानवाढीमुळे शहरी भागात 'उष्ण बेटं' निर्माण होण्यासारखे गंभीर परिणाम होत आहेत. पर्जन्यमानात बदल झाल्यामुळे काही भागात अचानक पूर येतो तर इतर भागात दुष्काळ पडतो. राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर अनुकूलन (adaptation) आणि संकटाला सामारे जाण्याच्या उपाययोजना (mitigation) करण्यासाठी अनेक गोष्टींवर चर्चा होत आहेत. परंतु अजूनही जमिनी पातळीवर फारच कमी अंमलबजावणी केली जात आहे. पर्यावरणीय संकटाला जबाबदार असणारे आणि त्याचे परिणाम भोगणारे यांच्यात प्रचंड विषमता आणि तफावत आपल्याला दिसते. मुख्यत्वे उपेक्षित आणि अनुसुचित समुदायांवर सर्वाधिक परिणाम होत असल्याचे दिसते. याची या समुदायांना फारशी जाणीवही नाही. सध्याचे विकासाचे प्रारुप पर्यावरणीय संकटांना जबाबदार आहे, परिणामी सामाजिक आणि पर्यावरणीय अन्याय होतो आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले जावे, पर्यावरणीय संकटामुळे होणा–या सामाजिक आणि पर्यावरणीय अन्यायाबद्दल जनमानसांत जागरूकता निर्माण करण्यात यावी तसेंच धोरणात्मक बदल घडवून आणावेत या उद्देशाने पाठपुरावा करावा यासाठी जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM) ने, 'सामाजिक आणि पर्यावरणीय न्यायासाठी' राष्ट्रीय आघाडी (NASECJ) गठीत केली आहे.

या संदर्भांत सहविचार करुन काम पुढे नेण्याच्या उद्देशाने पुण्यात ३० नोव्हेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्यस्तरीय परिषद घेण्यात आली. या वेळी ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ माधव गाडगीळ, दिल्लीतील जलवायु परिवर्तन तज्ञ सौम्या दत्ता, ओरिसा येथींल सामाजिक व पर्यावरणीय चळवळीतील जेष्ठ नेते प्रफुल्ल सामंतरा, सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर आणि विजय परांजपे यांनी या महत्त्वाच्या विषयावर आपले विचार मांडले. जन आंदोलनांचे काही साथी पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नसले तरी NAPM चे डॉ. संजय मं. गो., अतुल देऊळगावकर, परीणीता दांडेकर, विश्वंभर चौधरी, आशिष कोठारी यांनी आपण सोबत असल्याचे कळविले. कल्पनाताई साळुंके स्वत:आपले सहकारी प्रसाद सेवेकरी, सारंग यादवडकर, गुरुदास यांसह महाराष्ट्रातील अनेक अभ्यासकांनी सहभाग घेतला व आपल्याला पुढील दिशा ठरविण्याकरितां मोलाचे मार्गदर्शन केले.

चित्रकार रमाकांत धनोकर या मित्राने सजविलेला पत्रकार भवनातील मंच उठून दिसत होता, तो त्यावरील विशाल वृक्षामुळे. या झाडाच्या पानावर आपले नाव लिहून परिषदेचे उदघाटन मंचावरील सर्वांनी केले. पुढे दिवसभरांत परिषदेतील सर्व सहभागींनी सुध्दा उत्साहाने या कामासाठी आपली बांधिलकी अशीच जाहिर केली.

परिषदेचे प्रास्ताविक करतांना सुनिती सु. र. यांनी महात्मा गांधींच्या सुविचारांची आठवण करुन देत उपभोगवादी जीवनशैली व 'चमचमणारा विकास' हे एकंदर सर्व नैसर्गिक संसाधनांच्या विनाश करत असल्या कारणाने निसर्गावर अवलंबून असणाऱ्या आदिवासी समूहांच्या उपजीविका धोक्यांत येत आहेत. निसर्गातल्या विविध चक्रांमधील संतुलनांतील बिघाड आता धोक्याच्या पातळीवर पोहचले आहेत. त्यामुळे होणारे नुकसान कमी करण्याकरिता अथक परिश्रम करणे आपले कर्तव्य असल्याची

जाणीव त्यांनी करुन दिली. सूत्र संचलन करणा–या युवराज गटकळने सर्व निमंत्रितांची ओळख करून दिली.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त सौम्या दत्ता यांनी क्लायमेट क्रायसिसच्या संकटाची अतीशय जलद गतीने वाढणारी तीव्रता, त्यामागील गुंतागुंत, पृथ्वीच्या आठ–नऊ चक्रातील परस्परावलंबन बिघडण्या मागील विज्ञान सोपे करून समजविण्याचा प्रयत्न केला. याशिवाय त्यांनी काही अतिशय महत्वाचे मुद्दे मांडले. ते म्हणाले, आपण नेहमी म्हणतो 'पाऊस

हवा तर झाडे लावा'. पण लडाखमध्ये व हिमालयात भरपूर जंगलतोड झाली असूनसुध्दा तिथे खूप कमी वेळात धोधो पाऊस पडून पूर येतात. कारण तिथे फक्त स्थानिक नाही तर जागतिक पातळीवरील विविध घडामोडींचा परिणाम दिसतो आहे. जगातल्या दूरवरच्या उद्योगांमधून फेकले जाणारे घातक वायु व मोठे कण यामुळे होणारे हवामानबदल याला जबाबदार आहेत. दुसरे म्हणजे, सत्तेतील नेते आणि नफ्याकरिता हापापलेले कारपोरेटस क्लायमेट क्रायसिसचा मुकाबला करण्याकरिता जे उपाय सुचवितात त्यातले गोंधळ व फसवाफसवी आपण समजून घ्यायला हवी. मोदी जनतेला म्हणतात, पर्यावरण रक्षणासाठी साधी जीवनशैली अवलंबा. पण तेच पर्यावरणाला घातक अशी धोरणं ठरवतात. ताजे उदाहरण म्हणजे एकिकडे अडानीसाठी सगळीकडे विमानसेवेला प्रोत्साहन देतात तर जनतेला दुसराच उपदेश करतात. त्यांना सांगायला हवं, विमानप्रवासामुळे रेल्वेपेक्षा कितीतरी अधिक नुकसान होतं पर्यावरणाचं. सौम्या दत्ता मच्छिमारांच्या कार्यशाळा घेतात. वादळं किनारपट्टीला आदळण्याची शक्यता व तीव्रता वाढते आहे तर आपले जीव वाचविण्यासाठी काय काय करण्यांत यावे, याचा प्रशासनाकडे आग्रह धरायला हवा यासाठी मार्गदर्शन सुध्दा करतात. त्यांचे संपूर्ण भाषण युट्युब वर मिळेल.

महाराष्टातील ज्येष्ठ पर्यावरण तज्ञ माधव गाडगीळ यांनी संपूर्ण पश्चिम घाटाचा व किनारपट्टीचा सखोल अभ्यास केलेला आहे हे आपण जाणतोच. त्यांनी दगड खाणींच्या उदाहरणाने आपल्या तथाकथित विकासाच्या हव्यासाने बेकायदेशीर खाणी चालवून वायनाड सारखी संकटं ओढवून घेतो, धोक्याच्याच ठिकाणी गरीब मजूरांच्या वस्त्या बनवतो. जीवित हानी होते तेंव्हा नैसर्गिक आपत्ती म्हणून जबाबदारी झटकू पाहतो. पण या खाणीतून निघणा–या मोठ्या कणांचा क्लायमेट क्रायसिसशी कसा संबंध आहे ते त्यांनी स्पष्ट केलं.

मेधा पाटकर यांनी दुरस्थ संवाद साधत विनाशकारी विकासाच्या प्रारुपाचा फेरविचार करण्याची गरज मांडली आणि नद्या वाचविण्याचे महत्व अधोरेखित केले. ज्यांना क्लायमेट क्रायसिस मुळे येणारी वादळे, अचानक पूर किंवा दुष्काळ, अवेळी पावसामुळे होणारे शेतीचे नुकसान या सगळ्यांत आपली जगण्याची सुरक्षितताच गमवावी लागते त्यांना किमान तात्काळ मदत मिळावी व पर्यायी उपजीविका मिळावी याकरिता त्यांच्या सोबत उभे राहून त्यांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी घेण्याचे व त्यांचे नुकसान कमी व्हावे याकरिता सक्रिय होण्याचे त्यांनी सर्वांना आवाहन केले.

पर्यावरणवादी व जनवादी अर्थतज्ञ विजय परांजपे यांनी पर्यावरण संकटा संदर्भात काम करतांना आपल्या पध्दतीत थोडा बदल करण्याचा सल्ला दिला. आपण क्लायमेट क्रायसिसबद्दल जागतिक स्तरावरील घडामोडी, त्यातील विज्ञान, गुंतागुंत हे सर्व नक्की समजून घ्यायलाच हवं पण प्रशासनातील लोकांनाही संवादाच्या पध्दतीने ते समजावून देत अगदी तलाठी, तहसिलदार अशा स्थानिक प्रशासनाला सोबत घेत मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा. आपल्या त्रीस्तरीय प्रशासन पध्दती नुसार स्थानिक, राज्य व राष्ट्रीय स्तरावर काम करण्याच्या जबाबदारीचे वाटप करावे, असे ही त्यांनी सुचविले.

उदघाटन सत्राचे अध्यक्ष प्रफुल्ल सामंतरा यांनी पर्यावरण संकट–क्लायमेट क्रायसेस संबंधित घडामोडींसंदर्भातील राजकारण समजून घेणे कसे खूप महत्वाचे आहे याकडे लक्ष वेधले. आपले सत्ताधारी आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये घोषणा करतात की आम्ही नवीन औष्णिक उर्जाप्रकल्प आणणार नाही. मात्र प्रत्यक्षात धोरणात्मक बदल करत नाहीत. संपूर्ण जागतिक भांडवली व्यवस्था ही धनदांडग्यांना मदत करणारी, मोनोपालीला/एकाधिकार शाहीला मदत करणारी आहे. ओरिसा, झारखंड, छत्तिसगड मध्ये बेसुमार खनन करून नफेखोरी करणा–यांना पाठीशी घालणारी आहे. त्यामुळे जंगल, जमीन, नद्यांचा नाश होतो. त्यावर अवलंबून जगणारे आदिवासी, शेतकरी आपले जीवन आधार वाचविण्यासाठी लढतात. त्यांना साथ द्यायला हवी. तरच आपल्याला क्लायमेट जस्टिसच्या दिशेने पुढे जाता येईल. आता सुशिक्षितांमध्ये वैचारिक क्रांतीची गरज आहे. त्याकरिता प्रयत्न करायला हवेत, असे त्यांनी सुचविले.

या नंतरच्या सत्रात महाराष्ट्राच्या विविध लढ्यांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यक्षेत्रांतील घटनांचा व त्यांना समजलेला पर्यावरण संकटाचा संबंध याबद्दल मांडणी केली. प्रसाद बागवे यांनी पुण्याजवळील मोसे खो–यांत लवासा कंपनीने केलेल्या ब्लास्टिंगमुळे तिथले नैसर्गिक जलस्त्रोत तर उध्वस्त झालेच पण

कणखर सह्याद्रीचा तिथला डोंगर खिळखिळा झाला व सध्याच्या एकदम कोसळलेल्या पावसांत कंपनीने बांधलेल्या बंगल्यासह डोंगर ढासळून चिखलाच्या नदीमुळे रस्ता बंद पडल्याची कथा सचित्र दाखविली. सिंधुदुर्गातून आलेल्या अक्षय रेवंदकर यांनी फिशमिल तयार करणारी कंपनी 'प्रक्रिया न करताच सांडपाणी थेट समुद्रांत सोडते'. त्यामुळे त्रस्त झालेल्या परिसरातील नागरिकांनी समन्वयाला मार्गदर्शन व मदतीसाठी पाठविलेले निवेदन वाचून दाखविले. या जल प्रदूषमामुळे माशांची संख्या घटून त्यांची उपजीविका तर नष्ट होते आहेच, शिवाय किनारपट्टीवरील जैवविविधता सुध्दा नष्ट होत असल्याची चिंता त्यांनी मांडली. अविनाश उषा वसंत यांनी कोकणातील नाणार रिफायनरी विरोधी लढ्याचे प्रतिनिधी म्हणून मांडणी केली तर वाढवण बंदर ते पाणेरी नदीचे प्रदुषण अशा तथाकथित विकासाने त्रस्त पालघर जिल्ह्याचे प्रतिनीधित्व सुजय मोरे यांनी केले.

मुंबईतील वस्त्यांमध्ये अनेक वर्ष कार्यरत व आता तर राष्ट्रीय स्तरावर देशभरातील शहरी गरीबांचे प्रश्न ऐरणीवर आणणा–या आपल्या समन्वयाच्या मंचाच्या सदस्य पूनम कनोजिया यांनी मुंबईच्या समुद्राला मागे सारत जोमाने पुढे जाणारे प्रकल्प, कांदळवन वाचविण्याकरता वस्तीतील लोकांनी केलेल्या निवेदनांकडे प्रशासनाने दुर्लक्ष करणे व 'धारावी सुधार'च्या नावाने मीठागरांची जमीन अडाणीला हस्तांतरित करणे, आरे क्षेत्रात रातोरात हजारो वृक्ष तोडणे, रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण व ए सी बसेस यामुळे होणारी तपमानवाढ आणि वाढत्या तापमानांमुळे बांधकाम मजुरांपासून घरेलू कामगारांपर्यंत कष्टकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या मांडल्या आणि क्लायमेट क्रायसिसच्या बद्दल जनमानसांत जागृतीची गरज मांडली. त्यासाठीच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली. स्वत: फुटपाथवर स्टॉल चालविण्याचा अनुभव घेतलेल्या युवराज गटकळने हातगाडीवर स्टॉल चालविणा–यांबद्दल शिक्षित समाजाच्या अनास्थेबद्दल खेद व्यक्त केला. स्वत: केलेल्या सर्वेक्षणातून समोर आलेल्या वाढत्या तपमानांत काम करावे लागल्यामुळे त्यांच्या आरोग्याला होणारे हादसे व योग्य वैद्यकीय सेवा मिळावी याकरिताच्या सार्वजनिक सेवांचा अभाव व तुटपुंज्या उपलब्ध सेवांबद्दल देखिल माहितीच नसणे याबद्दलची निरिक्षणे नोंदवली. यावरून सामाजिक व पर्यावरणीय न्यायाच्या दृष्टीने काम करण्याची तातडीची गरज अधोरेखित करत यासाठीची स्वत:ची बांधिलकी जाहिर केली.

उत्तर महाराष्टातील नंदुरबार जिल्हयांतील पुन्याभाऊ हे अनेक वर्ष सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन स्थळातील सरपंच म्हणून जबाबदारी सांभाळतात. प्रत्येक सरदार सरोवर प्रकल्पग्रस्ताचे योग्य पुनर्वसन होत नाही तोवर सुरु असलेल्या अधिकारांसाठीच्या लढ्यांत सक्रिय असतात. पेसा कायदा असून सुध्दा प्रशासन अजूनही ग्रामसभांना संपूर्ण स्वातंत्र्य देत नाही याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली व पर्यावरणीय संकटाचा मुकाबला करण्याकरिताची बांधिलकी जाहीर केली. विदर्भातील वाढत्या तपमानाचा मुद्दा महत्वाचा असला तरी महाराष्ट्राचे उत्तम जंगल असलेल्या गडचिरोली परिसरांत लहानमोठ्या ठेकेदारांना शासनव्यवस्थाच बेकायदेशीर खननाची सूट देते आहे. स्थानिकांचा विरोध मोडून काढण्यासाठी खोट्या जनसुनवायांचे नाटक व बळाचा किती वापर करते याच्या बातम्यादेखिल क्वचितच आपल्या पर्यंत पोहचतात. कुरखेडा–कोरची परिसरांतील लोह खनिज प्रकल्प विरोधी संघर्ष आपल्या समन्वयाशी संलग्न आहे. त्यांचे प्रतिनीधी सहभाग घेऊ शकले नाहीत. मात्र या परिसरांत गेली चार दशके लोकांसोबत राहून त्यांना वन हक्क कायदा, जैवविविधता कायदा व पेसा कायदा यांच्याबद्दल मार्गदर्शन करत ग्रामसभांना सक्षम करण्यात सक्रिय डॉ. सतिश गोगुलवार यांनी आपल्याला एक व्हिडिओ पाठवला. त्यांत छत्तीसगढ सीमे जवळील आधीच्या नक्षल प्रभावित भागांत अहिंसक संघर्षाच्या आधारे जंगलातील आदिवासी व अन्य समाजांनी एकजूटीने आपल्या जंगलातील संपत्तीचे संरक्षण व संवर्धन केले. आता क्लायमेट क्रायसिसचा सामना करत आपल्या उपजीविका सुरक्षित ठेवण्यासाठी कसे प्रयत्न केले ते या व्हीडियोतून आपल्यापर्यंत पोहचविले. या परिसरातील महिलांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये तुळजापूरच्या 'महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेत' पर्यावरणीय संकटाचे महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम व त्याचा मुकाबला करण्यासाठीच्या प्रयत्नांबद्दल मांडणी केली होती. मराठवाड्यातून आलेले प्रतिनिधी श्री धनाजी धोतरकर व त्यांच्या पत्नी या दीर्घ काळ पारंपारिक बीजांचे जतन व संवर्धनाचे काम करतात त्याबद्दल त्यांनी मांडणी केली. दुष्काळ प्रवण मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्यांसाठीच नाही तर देशभरातील लोकांसाठी असे प्रयत्न आता क्लायमेट

क्रायसिसच्या काळांत विशेष महत्वाचे आहेत, असे त्यांनी अधोरेखित केले. तुळजापूर येथील परिषदेच्या आयोजनांतही त्यांनी महत्वाची भूमिका निभावली होती. या परिषदेत राज्यातील विविध सामाजिक व भौगोलिक स्तरातील सहभागी महिलांनी सखोल चर्चेनंतर खूप महत्वाचे ठराव संमत केलेत. धोतरकर यांनी त्यांची मांडणी केली व ते ठराव आपल्या आज जाहीर होत असलेल्या मंचाने सुध्दा स्विकारावेत अशी विनंती केली. (तुळजापूरच्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेतील पर्यावरणीय संकटा संदर्भातील तीन ठराव लेखाच्या शेवटी चौकटित दिलेले आहेत.)

सोनम वांगचुक यांच्या पुढाकाराने सुरु असलेल्या लडाखच्या आंदोलनाला पुण्यातून पाठींबा देणाऱ्या गटातर्फे, प्रीती पुष्पा प्रकाश या युवतीने त्यांच्या पदयात्रेच्या दरम्यान केलेल्या महत्वाच्या आवाहनाचा व्हिडिओ दाखवला. यामुले आपल्या परिषदेची व या मंचाची नाळ राष्ट्रीय स्तरावरील क्लायमेट क्रायसीसग्रस्तांशी जोडली गेली.

परिषदेच्या तिसऱ्या सत्रात पर्यावरणाच्या विविध पैलूंचा दीर्घकाळ अभ्यास करणाऱ्या अभ्यासक व कार्यकर्त्यांनी त्यांच्या कामाची थोडक्यांत तोंड ओळख करून देत, आपल्या सामाजिक व पर्यावरणीय न्यायाकरिता, वंचितांच्या व शेतकरी–कष्टकरी यांच्या संघर्षाला मजबूती देण्यासाठी कार्यशाळांमध्ये तसेच स्थनिक परिस्थितीचा सहभागी पध्दतीने अभ्यास करण्यास मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले. यात सहभाग घेतला होता ठाणे ग्रामीण परिसरांत चार दशके स्थानिकांना नैसर्गिक संसाधनांवर प्रथम अधिकार मिळावा याकरिता सक्रिय इंदवी तुळपुळे, भूजलतज्ञ रवींद्र सिन्हा, पाणी पंचायतच्या कल्पनाताई साळुंके यांचे सहकारी व ग्राम गौरव प्रतिष्ठान खळदचे प्रसाद सेवेकरी, पर्यायी पध्दतीने शेती करणा–या बाबूलाल गांधींवर 'विंचुर्णीचे गांधी' ही फिल्म करणारी सीमा अग्रवाल, शेतीचे प्रश्न व आत्महत्त्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा संशोधनात्मक आभ्यास करणारी ईरा अतुल देऊळगावकर यांनी ग्रामीण प्रश्नांवर प्रकाश टाकला. सुजित व विद्या पटवर्धन व साथींनी स्थापन केलेल्या परिसर संस्थेचे रणजीत गाडगीळ यांनी पर्यावरण पूरक शहरीकरणाचा मुद्दा मांडला.

क्लायमेट क्रायसिसमुळे मुख्य तीन परिणाम होणार आहेत ते असे की, जैवविविधता नष्ट होणार, पाणी प्रश्न अधिकच गंभीर होणार व अन्न सुरक्षा धोक्यांत येणार. यामुळे जगभरांतील विविध ठिकाणच्या उपजीविका, जगण्याचे आधारच नष्ट होऊ नयेत म्हणून विविध पैलूंचा एकत्रित अभ्यास करण्याची व या संकटाचा मुकाबला करण्यासाठी एकजुटीने लढण्याची गरज अधिकच स्पष्ट होत गेली. या सर्वांचा समाजातील विविध घटकांच्या मानसिक व शारिरीक आरोग्यावर होत असलेल्या परिणामांबद्दल अर्चना मिराशी व रीतु परचुरे यांनी मांडणी केली तर गुरुदास नुरकार यांनी ऊर्जा क्षेत्राबद्दलच्या गुंतागुंती सागतांनाच, माधव गाडगीळ सरांच्या सोबत निसर्ग वादळग्रस्तांसोबत केलेले काम सांगितले आणि तसेंच काम आपल्यासोबत करण्याचे आश्वासन दिले. सारंग यादवाडकरांनी शाश्वत विकासाची मांडणी केली. (या सर्वांकडून त्यांची सविस्तर टिपणे मागवली आहेत व ती मालिकाच आपण आंदोलन मासिकातून प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत आहोत.)

क्लायमेट क्रायसिसचा मुकाबला करत पर्यावरणीय व सामाजिक न्यायासाठी पुढे जाण्याच्या प्रक्रियेची, ही परिषद फक्त सुरवात आहे. प्रक्रिया पुढे नेण्यासाठी एक अस्थायी समिती स्थापन केली आहे. त्यांत संतोष ललवानी, अमितराज देशमुख, सिरत सातपुते, युवराज गटकळ, सुजय मोरे सहभागी असतील. (संपर्कासाठी फोन 9867680006). या समितीला ईला कांबळी, सुनीती सु.र. ,संजय मं. गो. व सुहास कोल्हेकर यांचीही साथ निश्चितच असेल. परिषदेची सांगता करतांना 'सामाजिक व पर्यावरणीय न्यायासाठी जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय' हे बॅनर उघडण्यात आले व महाराष्ट्र राज्य स्तरावरचा मंच स्थापन झाल्याचे जाहीर करण्यांत आले.

(लेखिका एनएपीएमच्या पूर्व राष्ट्रीय समन्वयक असून शिक्षण, पर्यावरण आदी मुद्द्यांवर सक्रीय आहेत.)

kolhekar.suhas@gmail.com

वर्गणीत माफक वाढ!

आधी जाहीर केल्या प्रमाणे, १ जानेवारी २०२५ पासून आंदोलनच्या वर्गणीत माफक वाढ करण्यात आली आहे. सर्वांचे सहकार्य अपेक्षित! तपशील पान २ वर. वर्गणी भरा, देणगी वा जाहिरात द्या व चळवळीस सहयोग करा!

टिप्पणी

तरुणांनी राजकीय अर्थव्यवस्थेच्या भिंगातून बघायला शिकावे!

संजीव चांदोरकर

खालील बातमी आणि त्यातील आकडेवारीचे स्केल बघा. काही अपवादत्मक प्रश्न घेऊन उरबडवेपणा नाही करत आहेत आपण. कारण असंवेदनशील राज्यकर्ते अशा भावनिक अपिलाच्या पलीकडे गेलेले आहेत. पण अशा बातम्यांमधून सध्याच्या राजकीय अर्थव्यवस्थेचे दर्शन होते, या व्यवस्थेचे कॉर्पोरेट धार्जिणेपण आणि गरिबांप्रती असंवेदनशीलता समजते म्हणून त्याची माहिती घेतली पाहिजे

'वीज बिल भरले नाही म्हणून महाराष्ट्र सरकारच्या मालकीच्या महावितरण कंपनीने, महाराष्ट्र सरकारच्या जिल्हा परिषदांच्या २५,१६७ शाळांचा वीजपुरवठा कापला. त्यातील ४,९३९ शाळांचे वीज मीटर काढून नेण्यात आले'. किती शाळांचा ? २५,१६७ ! किती काळ ? एका वर्षपासून !! वीज बिलाची थकबाकी किती होती? ११.११ कोटी रुपये!!!

अनेक महिन्यांच्या ओरड्यानंतर आता महाराष्ट्र शासन ते पैसे महावितरणला देणार आहे. आणि महावितरण वीजपुरवठा पूर्ववत करणार आहे. (त्याशिवाय अजून तीन जिल्ह्यांचा प्रश्न प्रलंबित आहे)

किमान सरासरी ५०० विद्यार्थी एका शाळेत धरले तरी सव्वा कोटी विद्यार्थी होतात. या विद्यार्थ्यांना गेले काही महिने वर्गांमध्ये लाईट, फॅन, पाण्याच्या टाकीत पाणी भरण्यासाठी वापरले जाणारे पम्प सुरु नसतील. वर्ग अंधारलेले असतील. मुलांच्या अभ्यासात लक्ष लागण्यावर त्याचा परिणाम नसेल झाला? जिल्हा परिषद शाळांचे उत्पन्नाचे स्रोत काय? जे आटल्यामुळे त्यांना वीजबिले भरता आली नाहीत? यावर चर्चा झाल्या पाहिजेत. आपण सार्वजनिक क्षेत्राचा आग्रह धरतो. इथे महावितरण आणि जे वीज भरू शकले नाहीत त्या शाळा दोन्ही सार्वजनिक मालकीच्या. सार्वजनिक मालकीची महावितरण खाजगी मालकीच्या वीज वितरण कंपनीसारखी वागत असेल तर काय चाटायचंय खाजगी मालकीला? खाजगी उद्योग समूह बघा. ग्रुप कंपन्या कशा एकमेकांना बेलआऊट करतात. मग सार्वजनिक उपक्रम का नाही? वीज पुरवठा कापताना नफा कमावणाऱ्या कंपन्या आणि शाळा / इस्पितळे यामध्ये वीजवितरण कंपन्यांनी फरक करावा की नको? हा प्रश्न राजकीय अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. महावितरण अधिकाऱ्यांवर सोपविता कामा नये. महावितरण शाळांच्या व्यवस्थापनाला धडा शिकवू पाहते. मार कोणाला पडला विद्यार्थ्यांना. यात या गरीब विद्यार्थ्यांचा काय दोष? जर राजकीय अर्थव्यवस्था गरीब विद्यार्थी केंद्री नसेल तर? त्यांच्या होणाऱ्या नुकसानीची भरपाई तरी होऊ शकणार का? वीज बिलाची रक्कम किती ११ कोटी ? महाराष्ट्राचा वार्षिक अर्थसंकल्प किती ७ लाख कोटी? वीजबिल भरले नाही म्हणून वीज कापली गेली आहे हा मेसेज गेल्यानंतर पैसे मंजूर करायला राज्य सरकार इतके महिने घेते? नक्की कोणत्या फाईल्स फास्ट ट्रॅक पद्धतीने मंजूर केल्या जातात? अदानी समूहाच्या? ज्या शाळांची वीज कापली, त्या शाळांमध्ये लाडक्या बहिणींची कितीतरी मुले असतीलच. एकही लाडकी बहीण म्हणत नाही की अहो मंत्री महोदय प्रत्येकीला फक्त ५ रुपये कमी द्या. दोन कोटी लाडक्या बहिणीच्या योगदानातून १० कोटी सहज उभे राहिले असते.

असे अनेक बिंदू पुढे आणता येतील. हे असे विचार करणे म्हणजे राजकीय अर्थव्यवस्थेच्या भिंगातून आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे बघणे. कॅटरॅक्ट ऑपरेशनच्या वेळी जसे डोळ्यात नवीन भिंग बसवतात त्याप्रमाणे अशी भिंगे कोट्यवधी नागरिकांच्या डोळ्यात बसवण्याची गरज आहे. तरुणांना आवाहन: आजूबाजूच्या घटनांकडे बघण्यासाठी राजकीय अर्थव्यवस्थेचे लेन्स implant करून घ्या!


(लेखक राष्ट्र सेवा दलाचे विश्वस्त, आर्थिक प्रश्नांचे विश्लेषक व लेखक आहेत.)

chandorkar.sanjeev@gmail.com

ध्येय आमुचे हे ठरले, कार्य दुसरे ना उरले ;
क्षणभर आता राहू न आम्ही शांत !


MS-CIT मध्ये अनुभवा
AI - ML च्या रंजक दुनियेची सफर !
Artificial Intelligence and Machine Learning
Machine Learning (ML)
Virtual Reality (VR)
Internet of Things (IoT)
Robotics
3D Printing
Mobile App Development
ChatGPT
Unlock your
Digital
Curiosity
Generative AI
Artificial Intelligence
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
Powered by AI-ML
mscit.mkcl.org









वरील पुस्तके सवलतीत उपलब्ध!!

साने गुरुजी १२५ अभियान समारोप समारंभात पुणे येथे डॉ. संजय मंगला गोपाळ यांचे **'लोकशाही समाजवादी चळवळ पुन्हा गतीमान करणे आवश्यक'**, सुनिता मगदूम - बिरनाळे यांचे **'श्यामच्या आईची काव्यचित्रे'** आणि साने गुरुजी लिखित **'माझ्या मनातील आदर्श शाळा व कुमारांपुढील कार्य'** या तीन पुस्तकांचे सृजन प्रकाशनवतीने प्रकाशन झाले आहे. यावेळी मंचावर प्रा. सुभाष वारे, सुनिती सु. र., सिरत सातपुते, ॲड. विजय दिवाणे, श्रीनिवास शिंदे आदी उपस्थित होते.

ही तीनही पुस्तके एकत्रित रु. १४०/- ना आहेत. सवलतीत रु. १००/- ला देता येतील + पोस्टेज.

संपर्क : संजय रेंदाळकर ९६०४८२१९४१

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.

To